दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ६ वे अंक –२०८ मंगळवार दि.०७ एप्रिल २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-208 Tuesday, Dt.07 April 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# वेळ सांगून येत नाही प्रत्येकाने आयुष्मान कार्ड काढावे – डॉ ओमप्रकाश शेटे

## गैरउद्योग कराल तर फौजदारी कारवाईचे शिकार व्हाल..!

### १३५६ वरून २३९९ पॅकेज....

पूर्वीच्या जीवनदायी, राजीव गांधी, महात्मा फुले आरोग्य योजनेअंतर्गत १३५६ पॅकेज अंतर्गत उपचार दिले जात होते. त्यावर तीन लाखापर्यंतच मर्यादा होती. आता त्यामध्ये काळानुसार अमुलाग्र बदल करून २३९९ पॅकेजचा समावेश करत जवळपास ५ लाखापर्यंत आणि वयोवृद्ध असतील तर दहा लाखापर्यंत मर्यादा वाढवण्यात आली आहे. यामुळे आता सरकार तुमच्या आरोग्याची काळजी घेत आहे.



बीड / वैभव स्वामी

यापूर्वीच्या जीवनदायी आरोग्य योजना, राजीव गांधी जीवनदायी आणि महात्मा फुले जीवनदायी योजनेमध्ये अमुलाग्र बदल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या व्यापक दृष्टिकोनातून करण्यात आले आहेत.विविध आजारांवरील उपचारासाठी व्याप्ती वाढवून तीन लाख रुपयांची मर्यादा दहा लाख रुपयापर्यंत करण्यात आली आहे. आयुष्यमान भारत मिशन अंतर्गत झालेल्या या बदलानंतर पहिल्यांदाच अध्यक्ष म्हणून माझ्यावर जी विश्वासाने जबाबदारी दिली आहे ती मी पूर्ण करून जास्तीत जास्त रुग्णांना या योजनेचा लाभ देण्याचा प्रमाणिक प्रयत्न करणार आहे.या योजनेअंतर्गत कोणीही, कोणत्याही डॉक्टरांनी, हॉस्पिटलने जर गैर उद्योग करून शासनाचा निधी रुग्णांच्या नावे हडप करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाईसह थेट फौजदारी कारवाई करण्याचे संकेत देखील आयुष्यमान भारत मिशनचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिले.

महाराष्ट्र शासन आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे सोमवार, दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी केंद्र आणि राज्य शासनाच्या आयुष्मान भारत–प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत आढावा बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक नागेश चव्हाण यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यानंतर आयोजित पत्रकार परिषदेमध्ये समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे म्हणाले की, आयुष्मान भारत–प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत रुग्णांची कोणत्याही हॉस्पिटल अंतर्गत अतिरिक्त पैशाची वसुली किंवा उपचारांमध्ये कुठेही अडचणी निर्माण होऊ नये यासाठी राज्यस्तरावर विशेष यंत्रणा कार्यरत आहे.आयुष्यमान भारत मिशन अंतर्गत आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना रुग्णांच्या उपचारासाठी कल्याणकारी योजना ठरत आहे. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीमध्ये महाराष्ट्रातील २४ हजार १०८ लाभार्थी रुग्णांवर एक किंवा एकापेक्षा अधिक वेळा शस्त्रक्रिया आणि उपचार करून जवळपास ४३ हजार २३४ शस्त्रक्रिया करण्यात आलेले असून त्यांच्या उपचारावर या मिशन अंतर्गत १२७ कोटी पेक्षा अधिक निधी खर्च करण्यात आला आहे. ही या मिशनची मोठी उपलब्धी आहे असे स्पष्ट करून ते म्हणाले, वयवंदनाचे १ लाख ५२ हजार लाभार्थी आहेत. मी मागील बैठकीला आलो होतो त्यावेळी बीड जिल्ह्यातील एकूण लाभार्थ्यांपैकी ३० टक्के सुद्धा लाभार्थ्यांचे कार्ड तयार करण्यात आलेले नव्हते. प्रशासकीय अधिकारी आणि डॉक्टरांची उपस्थिती बैठकीला चिंताजनक होती, त्यामुळे मी राग व्यक्त केला होता.आज जेव्हा मी बीडमध्ये बैठक घेऊन आढावा घेतला तेव्हा २३ लाख ४६ हजार ७७३ लाभार्थ्यांपैकी ११ लाखापेक्षा अधिक म्हणजेच ५० टक्के पेक्षा अधिक लाभार्थ्यांचे कार्ड तयार करण्यात आलेले आहेत. पांढरे, पिवळे, केसरी तीनही कार्डधारकांना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात येतो. त्यामुळे वेळ कधी आणि कशी कोणावर येईल हे सांगून येत नाही. आज आपण जरी निरोगी असलो तरी देखील कोणत्या प्रसंगातून आरोग्याची कोणती समस्या समोर उभी राहील हे आज सांगता येत नाही. त्यामुळे प्रत्येकानी आयुष्मान कार्ड काढावे ते जनरेट करावे हेच प्रत्येकाच्या हिताचे भविष्यात ठरणार आहे. ज्यावेळी आरोग्याची समस्या निर्माण होईल, दवाखान्यात ॲडमिट होण्याची वेळ होईल, त्यावेळी तुमच्याकडे कार्ड नसेल तर या योजनेअंतर्गत लाभ मिळत नाही. खिशात पैसे नाहीत, उपचार कसे करायचे ? हे प्रश्न जेव्हा गंभीर होतात त्यावेळी मी सुद्धा तुमच्या हक्काचा असताना सुद्धा काही करू शकणार नाही. त्यामुळे समस्या निर्माण होण्यापूर्वीच प्रत्येकाने आयुष्मान कार्ड काढावे आणि ते जनरेट करावे असे पुन्हा एकदा त्यांनी कळकळीचे आवाहन बीडसह महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकांना केले.

### कोणी लबाडी करत असेल तर या टोल फ्री क्रमांकावर तक्रार करा..?

आयुष्मान भारत ही आरोग्यदायी योजना देशातील सामान्य जनतेच्या आरोग्य हितासाठी निर्माण करण्यात आलेली आहे. केंद्र आणि राज्य शासन कोट्यावधी रुपये जनतेच्या आरोग्यासाठी देत आहे. मात्र या अभियान अंतर्गत जर कोणते हॉस्पिटल, डॉक्टर किंवा इतर कोणीही या माध्यमातून चुकीच्या पद्धतीने पैसे कमावण्याचा उद्योग करत असेल जर ही बाब कोणाच्याही लक्षात आली तर त्यांनी तात्काळ आयुष्मान भारत मिशनच्या टोल फ्री क्रमांक २३ ३२ २० ० या क्रमांकावर संपर्क करून तक्रार नोंद करावी. तक्रार कर्त्याचे नाव गोपनीय ठेवून दोषीविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल.यामुळे रुग्णांना थेट तक्रारी करण्याची आणि आरोग्य उपचाराच्या संबंधी माहिती देण्याचा अधिकार उपलब्ध करून दिलेला आहे.

### पुरुषोत्तम पुरीतील भाविकांच्या हितासाठी कटिबद्ध...!

बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी या प्राचीन मंदिराची महती जगभर आहे. या ठिकाणी ५० लाखापेक्षा जास्त भाविक दरवर्षी दर्शनाला येतात. त्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी मी स्वतः मुख्यमंत्र्यांना विनंती केली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी आणि भाविक भक्तांची गैरसोय टाळण्यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर केला आहे. भविष्यात या मंदिर परिसराचा संपूर्ण कायापालट करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहे. यामध्ये कोणीही राजकारण करण्याचा प्रयत्न करू नये असा थेट इशारा डॉक्टर ओमप्रकाश शेटे यांनी पत्रकार परिषदेतून दिला.

### बीड जिल्ह्यातील ४ हॉस्पिटलवर कारवाई,यापुढे माझी सरप्राईज भेट राहणार...

बीड जिल्ह्यात ७३ तक्रारी रुग्णांकडून दाखल झाल्या होत्या. त्यापैकी ६९ तक्रारी निकाली काढलेले आहेत. यात विशेष करून बीड जिल्ह्यातील ४ हॉस्पिटल चालक डॉक्टरांवर रुग्णांकडून औषध आणि इंजेक्शन साठी अतिरिक्त पैसे वसूल केल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी संबंधित हॉस्पिटल चालक डॉक्टरांना ११ लाख ७८ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावला आहे.

### बीड जिल्ह्यातील या हॉस्पिटलला दंड..?

शिवाजीराव हार्ड केअर अँड इर्मेजिन सेंटर यांनी १ लाख ८५ हजार रुपये अतिरिक्त पैसे वसुली केल्याचे निदर्शनास आले. परिणामी या हॉस्पिटलला १० लाख रुपये दंड आकारण्यात आला आहे. मेडिकेअर हार्ट अँड क्रिटिकल केअर हॉस्पिटल या ठिकाणी २६ हजार १४३ रुपये अतिरिक्त पैसे वसुली केल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी १ लाख ३० हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. वेलनेस मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल येथे १ हजार ५०० रुपये अतिरिक्त पैसे वसुली झाल्याचे निष्पन्न झाले असून त्यांना १३ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. संजीवनी हॉस्पिटल माजलगाव येथे ७ हजार रुपयांचे अतिरिक्त पैसे वसुलीचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी त्यांना ३६ हजार रुपयांचा दंड करण्यात आला आहे.

## इन बॉक्स



### सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ३५ हजार कोटींची विकास कामे होणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नाशिक /प्रतिनिधी

प्रभू श्रीराम यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या नाशिक त्र्यंबकेश्वरमध्ये पुढील वर्षी होणारा सिंहस्थ कुंभमेळा भव्य व अविस्मरणीय करण्यासाठी ३५ हजार कोटी रुपयांची विविध विकास कामे करण्यात येत आहेत. भाविकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात आले असून या प्रक्रियेत साधू- महतांचे मार्गदर्शन महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पान २ वर...

## भ्रष्ट कारभाराचा चिखल सेलगाव- शिंदे टाकळी पांदण रस्त्याचे काम निकृष्ट


### संतापलेल्या शेतकऱ्यांचे जालना जि.प.कार्यलयासमोर आमरण उपोषण

जालना / शेख फारूक




शासनाचा निधी हडप करायचा आणि शेतकऱ्यांच्या नशिबी मात्र कायमचा नरकवास द्यायचा असाच काहीसा संतापजनक प्रकार परतूर तालुक्यातील मौजे सेलगाव येथे उघडकीस आला आहे. सेलगाव ते शिंदे टाकळी या पांदण रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट थातूरमातूर आणि अर्धवट करून शेतकऱ्यांच्या डोळ्यात धूळफेक करण्यात आली आहे. या भ्रष्ट कारभाराविरोधात आता शेतकऱ्यांचा संयम सुटला असून दोषींवर कारवाईच्या मागणीसाठी ६ एप्रिल २०२६ पासून शेतकऱ्यांनी जालना जिल्हा परिषद कार्यालयासमोर पान २ वर...

## ज्ञानोबा नामदेव फड यांचे अपघातात निधन, आज दौंडवाडीत अंत्यसंस्कार



परळी वैजनाथ प्रतिनिधी

दौंडवाडी येथील ज्ञानोबा नामदेव फड यांचे आज झालेल्या अपघातात दुर्दैवी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६० वर्षे होते.

ज्ञानोबा फड हे सोमवार दि. ६ एप्रिल रोजी टेंपो क्रमांक चक१२ ज्ञ९५६० याने शेतातील माल घेऊन लातूरच्या बाजारात जात असताना अंबाजोगाई ते लातुर महामार्गावर सदर टेंपो पलटी झाला. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. कै. ज्ञानोबा फड यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, पान २ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## बीड जिल्ह्यातील प्रत्येकाच्या मना मनात कमळ निर्माण होई पर्यंत थांबू नका – शंकर देशमुख

### ज्येष्ठांचा सन्मान..फटक्यांची आतिषबाजी, ध्वजवंदन जिल्हा कार्यालयात स्थापना दिवस उत्साहात साजरा..!





बॉटम लाईन

बीड ।प्रतिनिधी

६ एप्रिल भाजपा स्थापना दिवस म्हणून राज्यभर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भारतीय जनता पार्टीने आज देशभरात मजबूत संघटन उभारले असून सामान्य जनतेच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जात आहेत. राष्ट्र प्रथम, नंतर पार्टी, शेवटी स्वतः अंत्योदयाची संकल्पना घेऊन, जनसामान्यांसाठी काम करणाऱ्या भाजपाला आज ४६ वर्ष पूर्ण झाली. आता आपण जिल्ह्यातील प्रत्येकाच्या मनामनात कमळ निर्माण करे पर्यंत थांबायचं नाही असे मत भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

ना. पंकजाताई मुंडे, माजी खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, राज्य.का. सदस्य ड. सर्जेराव तांदळे, विधानसभा नेते डॉ. योगेश क्षिरसागर, प्रवक्ते मा. रामजी पान २ वर...

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



संपादकीय....

## शबरीमला मंदिर सुनावणी

केरळमधील शबरीमला मंदिर प्रवेश प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात ९ न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर ७ एप्रिलपासून (आजपासून) अंतिम सुनावणी होणार आहे. ही सुनावणी शबरीमला मंदिरापुरती मर्यादित नसून धार्मिक स्वातंत्र्य, महिलांचे अधिकार आणि समानता यासारख्या महत्त्वाच्या घटनात्मक प्रश्नांवरती त्यात उहापोह करणार आहे. या खंडपीठाचे नेतृत्व सरन्यायाधीश सूर्यकांत करणार असून न्या. बी. व्ही. नागरत्ना, न्या. एस. एम. सुंदरेश, न्या. अहसानुद्दीन अमानुल्ला, न्या. अरविंद कुमार, न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसीह, न्या. प्रसन्न बी. वराळे, न्या. आर. महादेवन आणि न्या. जॉयमाल्या बागची यांचा समावेश आहे. शबरीमला मंदिरात १० ते ५० वयोगटातील महिलांना प्रवेशबंदी होती. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ही बंदी रद्द करत सर्व वयोगटातील महिलांना मंदिरात प्रवेशाची परवानगी दिली होती.

या निर्णयाचे देशभरात स्वागत आणि विरोधही झाला. निर्णयाविरोधात २०१९ मध्ये अनेक पुनर्विलोकन याचिकाही दाखल करण्यात आल्या. २०२० मध्ये या मुद्यावर सुनावणीसाठी ९ न्यायाधीशांचे खंडपीठ स्थापन करण्यात आले होते. आता ७ एप्रिलपासून या प्रकरणाची अंतिम सुनावणी होणार आहे. शबरीमला प्रकरण हे भारतातील एक अत्यंत महत्त्वाचे आणि चर्चित प्रकरण आहे. जे केरळ राज्यातील शबरीमला अय्यप्पा मंदिरात महिलांच्या प्रवेशावर असलेल्या पारंपरिक बंदीशी संबंधित आहे. हे प्रकरण धार्मिक परंपरा, महिलांचे अधिकार आणि भारतीय संविधानातील समानतेचा हक्क यांच्यातील संघर्ष म्हणून ओळखले जाते. या प्रथेला कायदेशीर आव्हान देण्यात आले. १९९१ मध्ये केरळ उच्च न्यायालयाने ही बंदी योग्य असल्याचे म्हटले होते मात्र कालांतराने ही प्रथा भारतीय संविधानातील समानतेच्या अधिकाराशी विरोधात असल्याचा मुद्दा पुढे आला. महिलांच्या हक्कांसाठी काम करणा-या संघटना आणि काही याचिकाकर्त्यांनी या बंदीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. २०१८ मध्ये भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय दिला. या प्रकरणाचा निकाल ५ न्यायाधीशांच्या खंडपीठाने ४-१ अशा बहुमताने दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, महिलांना मंदिरात प्रवेश नाकारणे हा लिंगभेद आहे आणि ते भारतीय संविधानातील समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन करते.

धार्मिक परंपरा असली तरी ती मुलभूत अधिकारांपेक्षा मोठी नाही त्यामुळे ही बंदी असंवैधानिक ठरवण्यात आली. या निर्णयानंतर सर्व वयोगटातील महिलांना शबरीमला मंदिरात प्रवेश करण्याची परवानगी मिळाली. या निर्णयानंतर केरळमध्ये मोठ्या प्रमाणावर विरोध व आंदोलन झाले. अनेक भक्तांनी या निर्णयाला धार्मिक भावनांचा अपमान मानले तर दुसरीकडे अनेकांनी हा महिलांच्या समान अधिकारांचा विजय असल्याचे सांगितले. काही महिलांनी पोलिस संरक्षणात मंदिरात प्रवेश केला त्यामुळे राज्यात मोठा तणाव निर्माण झाला होता. शबरीमला मंदिर हे केरळमधील पठाणमथिट्टा जिल्ह्यातील डोंगराळ भागात असलेले प्रसिद्ध हिंदू तिर्थस्थान आहे. येथे भगवान अय्यप्पा यांची पूजा केली जाते. भक्तांमध्ये अशी श्रद्धा आहे की, भगवान अय्यप्पा हे ब्रह्मचारी देवता आहेत त्यामुळे त्यांच्या मंदिरात रजस्वला गटातील म्हणजेच १० ते ५० वयोगटातील महिलांना प्रवेश निषिद्ध मानला जात होता. ही परंपरा अनेक वर्षापासून चालत आली होती आणि ती धार्मिक श्रद्धेचा भाग मानली जात होती. या प्रथेला कायदेशीर आव्हान देण्यात आले. १९९१ मध्ये केरळ उच्च न्यायालयाने ही बंदी योग्य ठरवली होती मात्र, कालांतराने ही प्रथा भारतीय संविधानातील समानतेच्या अधिकाराच्या विरोधात असल्याचा मुद्दा पुढे आला. महिलांच्या हक्कांसाठी काम करणा-या संघटना आणि काही याचिकाकर्त्यांनी या बंदीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले.

२०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय देताना म्हटले की, महिलांना मंदिरात प्रवेश नाकारणे हा लिंगभेद आहे आणि ते संविधानातील समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन करते. धार्मिक परंपरा असली तरी ती मुलभूत अधिकारांपेक्षा मोठी नाही. या निर्णयानंतर सर्व वयोगटातील महिलांना शबरीमला मंदिरात प्रवेश करण्याची परवानगी मिळाली. या निर्णयानंतर केरळमध्ये मोठ्या प्रमाणावर विरोध आणि आंदोलन झाले. या परिस्थितीनंतर २०१९ मध्ये या निर्णयावर पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आल्या. सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण मोठ्या घटनापीठाकडे पाठवले असून अद्याप अंतिम स्पष्ट निर्णय आलेला नाही त्यामुळे हा मुद्दा आजही न्यायालयीन आणि सामाजिक चर्चेचा विषय आहे.

# महावितरणकडून 'इकॅमेक्स-२०२६' मध्ये विद्युत सुरक्षेचा जागर

## केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी केले कौतुक




मुंबई ।प्रतिनिधी

इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या (इकॅम) वतीने गोरेगाव येथील बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये 'इकॅमेक्स-२०२६' या तीन दिवसीय प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महावितरणच्या प्रदर्शनीला केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी भेट शनिवारी (दि. ४) भेट दिली व विविध योजनांच्या अंमलबजावणीची माहिती घेतली.

गोरेगाव येथे 'इकॅमेक्स-२०२६'चे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री ना. श्री. श्रीपाद नाईक यांच्याहस्ते झाले. विद्युत कंत्राटदारांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून विद्युत क्षेत्राच्या माध्यमातून प्रगतीस हातभार लावावा असे आवाहन श्री. नाईक यांनी केले. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी सांगितले की, मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात ऊर्जा क्षेत्रात राज्याने देशात मोठी आघाडी घेतली आहे. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी शाश्वत व स्वस्त विजेसाठी ऊर्जा परिवर्तनाचा 'रिसोर्स अॅडेक्वेसी प्लॅन' तयार केला आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला मोठी गती दिली आहे. सौर ऊर्जेच्या योजनांद्वारे सद्यस्थितीत २० लाख ६६ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा सुरु झाला आहे. तर पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेमधून आतापर्यंत ५ लाखांवर घरगुती ग्राहकांनी लाभ घेतल्याचे श्री. पवार यांनी सांगितले.

केंद्रीय राज्यमंत्री ना. श्री. नाईक यांनी प्रदर्शनीतील महावितरणच्या दालनाला भेट दिली आणि विविध योजना, उपक्रमांची माहिती घेत कौतुक केले. त्यांचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी स्वागत केले व माहिती दिली. यावेळी विशेष कार्य अधिकारी श्री. सुधन्वा पत्की (नवी दिल्ली), इकॅमचे अध्यक्ष श्री. देवांग ठाकूर, सरचिटणीस श्री. अमरनाथ पाटील आदींची उपस्थिती होती.

या तीन दिवसीय प्रदर्शनीत महावितरणचे मुख्य अभियंता श्री. पंकज तगलपल्लेवार आणि विद्युत सुरक्षा मोहिमेचे समन्वयक डॉ. संतोष पाटणी यांनी सोमवारी (दि. ६) विशेष सत्रात विद्युत सुरक्षेबाबत प्रबोधन केले. महावितरणच्या अभियानामध्ये सहभागी होत ग्राहक संवादाद्वारे विद्युत सुरक्षेचा जागर करण्याची ग्वाही यावेळी इकॅमच्या वतीने देण्यात आली.

महावितरण प्रदर्शनीद्वारे अधीक्षक अभियंता श्री. संजय खंदारे, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. भारत पवार, अतिरिक्त कार्यकारी अभियंता जितेंद्र राठौर यांच्यासह अभियंता, अधिकाऱ्यांनी महावितरणच्या विविध योजना व विद्युत सुरक्षेसंदर्भात नागरिकांना माहिती दिली.



## मल्लिकार्जुन स्वामी यांचे निधन

लातूर ।प्रतिनिधी

चाकूर तालुक्यातील कलकोटी पंचक्रोशीत स्वामी महाराज म्हणून ओळखले जाणारे मल्लिकार्जुन शंकर स्वामी (वय ८४) यांचे रविवार, ५ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता अल्पशा आजाराने लातूर येथील निवासस्थानी निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सकाळी ९ वाजता श्री सिद्धेश्वर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. पोलिस कर्मचारी महारुद्र स्वामी व रत्नाकर स्वामी यांचे वडील होत.

# गेवराई आपल्या हक्काचा मतदारसंघ, तो मिळवायचा आहे - प्रा. देविदास नागरगोजे

## कार्यकर्त्यांच्या पाठिशी आबा आणि मी खंबीर आहे - बाळराजे पवार



गेवराई ।प्रतिनिधी

राष्ट्र प्रथम, या उदात्त विचारातून भारतीय जनता पक्ष उभा राहीला,लोकांच्या प्रश्नावर बोलत राहीला. म्हणूनच, आज देशाच्या कानाकोपऱ्यात पक्षाची ताकद उभी राहीली आहे. एवढेच नव्हे तर, देशातल्या २१ राज्यात भारतीय जनता पक्षाची पक्षांची सत्ता असून, गेवराई मतदारसंघ आपल्या हक्काचा मतदारसंघ आहे. तो आपल्याला परत मिळवायचा आहे. गेवराई तालुक्यातील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आबा आणि दादांच्या नेतृत्वाखाली गेवराई मतदारसंघात ताकद दाखवून द्यायची असून, बुथ प्रमुखानी भाजपा स्थापना दिवशी पक्का निर्धार करावा, असे आवाहन भाजपाचे नेते प्रा. देविदास नागरगोजे यांनी येथे केले आहे. दरम्यान, गेवराई मतदारसंघातील कार्यकर्त्यांच्या पाठिशी आबा आणि मी खंबीर आहे. त्यांच्या सुखादुखात असून, पक्ष बांधणीसाठी बुथ प्रमुखांनी जबाबदार सांभाळून काम करावे असे आवाहन बाळराजे पवार यांनी केले. तर, पक्ष सांगेल त्या सर्व कार्यक्रमाच्या माध्यमातून गेवराई मतदारसंघात ताकद उभी करू, असे वचन माजी मंत्री बदामराव पंडित यांनी दिले आहे.

गेवराई येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात सोमवार ता. ६ एप्रिल रोजी, पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाभियान २०२६, भारतीय जनता पक्ष, गेवराई मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर माजी मंत्री बदामराव पंडित, बाळराजे पवार, अजय सवई, प्रकाश सुरवसे, संजय आंधळे, नवनाथ शिराळे,

ड. सुरेश हात्ते, शिवराज पवार, राजेश पवार, यशराज पंडित, श्रीकांत सानप, ड. रासकर, प्रा. पीटी चव्हाण, ज्ञानेश्वर खाडे, सचिन दाभाडे, रोहित पंडित, शिवराज पवार, यशराज पंडित, इश्वर पवार, सचिन दाभाडे, ज्ञानेश्वर खाडे यांची उपस्थिती होती. यावेळी श्रीकांत सानप, नवनाथ निराळे, अजय सवई यांनी पक्ष शिस्त, पक्षाची जबाबदारी कशी पार पाडायची, मतदारसंघात कसे पोहचायचे, मतदारांशी संपर्क कसा साधायचा, या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. गेवराई मतदारसंघातील कार्यकर्त्यांच्या पाठिशी आबा आणि मी खंबीर आहे. आम्ही त्यांच्या सुखादुखात असून, कधी ही हाक द्या. मात्र ,

पक्ष बांधणीसाठी बुथ प्रमुखांनी जबाबदार सांभाळून काम करावे असे आवाहन ही बाळराजे पवार यांनी केले. तर, पक्ष सांगेल त्य सर्व कार्यक्रमाच्या माध्यमातून गेवराई मतदारसंघात ताकद उभी करू, गेवराई मतदारसंघातील मतदारांनी नेहमीच साथ दिली आहे. पक्षाची ताकद पून्हा एकदा दाखवून देऊ, असे वचन ही माजी मंत्री बदामराव पंडित यांनी दिले आहे. यावेळी माजी अध्यक्ष सुशिल जवंजाळ, गेवराई नपचे गटनेते राजेंद्र राक्षसभुवनकर, जगन पवार, शिनू बेदरे, एजाज भाई मेंबर, आमन सुतार, एकबाल भाई, रणजित खाजेकर, युनुस भाई, खदीर बागवान, माजी जिप सदस्य पांडुरंग थडके, बाबा पिसाळ, राहुल खंडागळे, सचिन वावरे, सभापती महेश सौंदरमल, सभापती बद्दुशेठ, शहेदाद भाई, सरपंच मुकुंद बाबर, बदाम पौळ, श्याम कुंड, लक्ष्मण चव्हाण, माजी सरपंच अब्दुल भाई, अविनाश मोटे, श्याम निकम, कृष्णा पोटोळे, दत्तात्रय येवले, रामेश्वर पानखडे, अय्युब सय्यद, युनुस भाई, उज्ज्वल सुतार, रवी सुतार,

यांच्यासह, गेवराई तालुक्यातील भाजपाचे बुथ प्रमुख, कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन, वंदे मातरम, महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले. प्रास्ताविक इश्वर पवार यांनी केले. सूत्रसंचालन पत्रकार सुशिल टकले यांनी केले. आभार भाजपाचे एसआयआर समन्वयक माजी नगरसेवक भरत गायकवाड यांनी मानले.

पान १ वरुन...

### ज्ञानोबा नामदेव फड ...

सुना, नातवंडे असा परिवार आहे. सिने पत्रकार रमाकांत मुंडे यांचे ते साडू होत.

दरम्यान कै. ज्ञानोबा नामदेव फड यांच्या पार्थिवावर आज मंगळवार दि. ७ एप्रिल रोजी सकाळी १०:३० वाजता दौंडवाडी येथे अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

### बीड जिल्ह्यातील....

कुलकर्णी यांच्या उपस्थितीत भाजपा जिल्हा कार्यालय बीड येथे फटाक्यांची आतिषबाजीसह ध्वजवंदन करून पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आ. आदिनाथराव नवले पाटील, मा. पंजाबराव मस्के, मा. विजयकुमार पालसिंगंकर, मा. गजानन जगताप यांचा सन्मान करून स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी अॅड वाल्मिक निकाळजे नवनाथ शिराळे, मीराताई गांधले, शिवाजी आप्पा मुंडे, अजय सवाई, शांतिनाथ डोरले, सलीम जहागीर, अनिल चांदणे, सुवर्णाताई लांबरुड, इर्शाद भाई, वाल्मीक अण्णा निकाळजे, अभय वनवे, प्रा. देविदास नागरगोजे, ओमप्रकाश गिरी, संगीताताई धसे, सुनील मिसाळ, बालाजी पवार, डॉ. घुमरे, अशोक रसाळ, अशोक लोढा, नागेश तांबारे, ड. गोविंद शिराळे, प्रमोद रामदासी, संग्राम बांगर, जयश्री ताई मुंडे, भाग्यश्रीताई ढाकणे, शितलताई राजपूत, लता राऊत, शैलजाताई मुसळे, संध्याताई मिश्रा, अमोल वडतीले, राजू शहाणे, धनंजय वाघमारे, संभाजी सुर्वे, राजेश सारखा, भालचंद्र कुलकर्णी, अशोक घोडके, नरेश पवार, विठ्ठल ठोकळ, राजेश गवळी, किशोर काकडे, घोलप मामा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भ्रष्ट कारभाराचा चिखल...

आमरण उपोषण पुकारले आहे.

मुरुमाऐवजी मातीचा वापर रस्त्याची लागली वाट

शेतकऱ्यांनी केलेल्या खळबळजनक आरोपानुसार या पांदण रस्त्यावर नियमानुसार मुरूम टाकून मजबुतीकरण करणे अपेक्षित होते.मात्र संबंधित गुत्तेदार आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने मुरुमाऐवजी चक्क माती टाकून काम उरकण्यात आले.रस्ता पूर्ण होण्याआधीच तो उखडायला सुरुवात झाली असून ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. हा रस्ता आहे की शेत असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.३ किमीचे काम कागदावरच ? प्रत्यक्ष कामात मोठी कट

मिळालेल्या माहितीनुसार या रस्त्याचे अंतर ३ किलोमीटर मंजूर असताना प्रत्यक्षात मात्र केवळ १.५ दीड किलोमीटर काम करून उर्वरित रस्ता वाऱ्यावर सोडण्यात आला आहे. अर्धा रस्ता गायब करून निधी लाटण्याचा हा सरळ-सरळ प्रयत्न असल्याचा

पान १ वरुन...

आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या अर्धवट कामामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतात बैलगाडी किंवा ट्रॅक्टर नेणेही अशक्य झाले आहे.शेतकऱ्यांच्या हक्काचा पैसा खाणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची खैर नाही जोपर्यंत रस्त्याची सखोल चौकशी होत नाही आणि दोषींवर कारवाई होत नाही तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही.आक्रमक शेतकरी सेलगाव प्रमुख मागण्या आणि प्रशासनाचा ढिसाळपणा

तातडीची चौकशी निकृष्ट दर्जाच्या कामाची वरिष्ठ स्तरावरून चौकशी व्हावी.

देयके रोखा चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित कामाचे पेमेंट थांबवण्यात यावे,निलंबनाची टांगती तलवार, हलगर्जीपणा करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करा,दर्जेदार रस्ता कागदोपत्री घोडे न नाचवता प्रत्यक्ष दर्जेदार रस्ता तयार करून द्यावा. या मागण्यांसाठी जिल्हा परिषदेसमोर ठिय्या आंदोलन सुरू असून आता चेंडू प्रशासनाच्या कोर्टात आहे.

पांदण रस्ता हा शेतकऱ्यांचा कणा असतो पण इथे कणाच मोडण्याचे काम प्रशासनाने केले आहे. ऐन शेतीच्या हंगामात रस्त्याची दुरवस्था झाल्याने शेतमालाची वाहतूक धोक्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात तक्रार देऊनही दखल न घेतल्याने अखेर शेतकऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या दारात उपोषणाचे हत्यार उपसले आहे. आता या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन भ्रष्ट अधिकाऱ्यांचे मुखवटे फाडले जाणार की हा विषयही कागदोपत्री दडपला जाणार ? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ....

अखिल भारतीय संत समिती-राष्ट्रीय कार्य समितीच्या दोन दिवसीय बैठकीचा समारोप तपोवनातील श्री स्वामी नारायण मंदिर येथे झाला. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अखिल भारतीय संत समिती अध्यक्ष अविचल देवाचार्यजी, महंत श्री ग्यान देवसिंग महाराज, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष रविंद्रपुरी महाराज, संत निवृत्ती महाराज, रावसाहेब महाराज गोसावी, पुरुषोत्तम महाराज देहूकर, अशोक तिवारी, श्री यतिंद्रानंद गिरीजी महाराज, जनार्दनहरी महाराज, स्वामी संविदानंद सरस्वती, जितेंद्रानंद स्वामी, ब्रह्मेशनंद महाराज, राजेंद्र दास, महंत दुर्गादास महाराज, भक्तिचरणदास महाराज आदी उपस्थित होते.

यावेळी अविचल देवाचार्य, जितेंद्रानंद स्वामी, रवींद्रपुरी महाराज, तुषार भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आमदार ड. राहुल ढिकले, महापौर हिमगौरी आडके-आहेर, उपमहापौर विलास शिंदे, स्थायी समितीचे सभापती मच्छिंद्र सानप, माजी आमदार बाळासाहेब सानप, महानगरपालिकेचे नगरसेवक यांच्यासह देशभरातून आलेले साधू, संत, महंत उपस्थित होते.

## श्री क्षेत्र नारायणगड व श्री क्षेत्र भगवान गडाच्या नारळी सप्ताहाच्या सांगतेस आ. धनंजय मुंडे उपस्थित राहणार

उमापूर व बडेवाडी दोन्ही गावातील नारळी सप्ताहाची आज काल्याच्या कीर्तनाने होणार सांगता, आ.धनंजय मुंडे उपस्थित राहणार

परळी ।प्रतिनिधी

श्री क्षेत्र नारायण गड व श्रीक्षेत्र भगवानगड या दोन्हीही आध्यात्मिक गडांच्या नारळी सप्ताहाची आज (ता. ०७) एकाच दिवशी सांगता होणार असून या दोन्ही सप्ताहांना माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे हे उपस्थित राहणार आहेत.

श्री क्षेत्र नारायण गडाचा पारंपरिक नारळी सप्ताह हा गेवराई तालुक्यातील उमापूर येथे संपन्न होत असून धनंजय मुंडे हे आधी उमापूर येथील या सप्ताहास भेट देऊन श्रीनगर नारायण महाराजांचे व गडाचे महंत प्रेममूर्ती ह. भ. प. श्री शिवाजी महाराज यांचे दर्शन व आशीर्वाद घेतील.

श्रीक्षेत्र भगवानगडाचा पारंपारिक नारळी सप्ताह हा पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी गावात संपन्न होत असून उमापूर नंतर धनंजय मुंडे हे बडेवाडी येथील सप्ताहात भेट देऊन ऐश्वर्या संपन्न संत भगवान बाबा व गडाचे महंत न्यायाचार्य ह. भ. प. डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांचे दर्शन व आशीर्वाद घेतील.



श्री क्षेत्र नारायण गड व श्रीक्षेत्र भगवानगड या दोन्ही गडांना अखंड हरिनाम फिरत्या नारळी सप्ताहाची अनेक वर्षांची परंपरा असून माजी मंत्री धनंजय मुंडे हे मागील अनेक वर्षांपासून या दोन्ही सप्ताहाच्या सांगता समारंभात उपस्थित राहत आले आहेत. मागील वर्षी मुंबई येथून येताना हेलिकॉप्टर उड्डाणास वेळेवर परवानगी न मिळाल्याने ही परंपरा एकवेळा खंडित झाली मात्र यावर्षी पुन्हा धनंजय मुंडे हे दोन्ही नारळी सप्ताह स्थळी दर्शनासाठी येणार असून, या आध्यात्मिक व्यासपीठावरून ते बोलतील का ? काय बोलतील ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जयभिम महोत्सवात कार्यक्रमांची रेलचेल!

## जयभिम महोत्सवाचा आनंद घ्यावा संयोजन समितीचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

विश्वरत्न, बोधीसत्व, महामानव तथा राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीडच्या वतीने विविध कार्यक्रमाने साजरी होत आहे. हा जयभिम महोत्सव रविवार (दि.५) एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत साजरा होत असून या महोत्सवात धम्मदेसना, व्याख्याने, आरोग्य, विद्रोही कवि संमेलन, रक्तदान शिबिरे, भिमगीत स्पर्धा, समता ज्योत मिरवणूक आदी विविध कार्यक्रमांची रेलचेल होणार आहे. तरी या जयभिम महोत्सवाचा सर्वांनी आनंद घ्यावा असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

दरवर्षी विविध परिवर्तनवादी व सांस्कृतिक कार्यक्रमाने समाजाच्या स्वबळावर जयभिम महोत्सव साजरा केला जातो. यावर्षीही विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीडच्या वतीने विविध परिवर्तनवादी कार्यक्रम हाती घेत साजरी होत आहे. या जयभिम महोत्सवाची सुरुवात रविवार (दि.५) एप्रिल पासून महापुरुष सामन्य ज्ञान स्पर्धा व धम्मदेसना कार्यक्रम घेवून झाली आहे. हा जयभिम महोत्सव १४ एप्रिल पर्यंत चालणार असून या दहा दिवसांच्या कालावधीत विविध कार्यक्रम पार पडणार आहेत. विशेषतः म्हणजे बीडच्या सार्वजनिक जयभिम महोत्सवाचे कौतूक अवघ्या महाराष्ट्राने केलेले असून हा जयभिम महोत्सव आदर्श व प्रेरणा घालून देणारा ठरलेला आहे. जयभीम




महोत्सवातील सर्व कार्यक्रमांना उपस्थित रहावे असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड शहर यांच्याकडून करण्यात आले आहे.

असे होणार कार्यक्रम...

सोमवार दि.६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सकाळी १० ते ५ पर्यंत रक्तदान शिबीर, सायं ७ वाजता एका वादळाची सांगिनी:मी रमाई नाटिका, मंगळवार दि.७ रोजी दुपारी १२ वाजता महापुरुष वकृत्व स्पर्धा, सायंकाळी ७ वाजता चेतन चोपडे यांचा भव्य संगीत रजनी कार्यक्रम, बुधवार दि.८ रोजी सकाळी ११:३० वाजता चित्रकला स्पर्धा, सायंकाळी ७ वाजता प्रा.संदीप कदम यांचे व्याख्यान, गुरुवार दि.९ रोजी ११:३० वाजता विद्रोही कवि संमेलन, सायंकाळी ७ वाजता प्रा.जगदीश ओहोळ यांचे व्याख्यान, शुक्रवार दि.१० रोजी सकाळी ११:३० वाजता महिलांसाठी विविध स्पर्धा, सायंकाळी ७ वाजता प्रा.विलास खरात यांचे व्यख्यान, शनिवार दि.११ रोजी सकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत १८ तास अभ्यास( तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालय), सकाळी ८ वाजता क्रांतिसूर्य महात्मा फुले अभिवादन रॅली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ते महात्मा फुले पुतळा, सकाळी ११ वाजता भिमगीत गायन स्पर्धा, सायंकाळी ७ वाजता कमलाकांत काळे यांचे व्याख्यान, रविवार दि.१२ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ८ पर्यंत भव्य नृत्य स्पर्धा सोमवार दि.१३ रोजी अनिरुध्द वनकर यांचा भव्य संगीत रजनी कार्यक्रम (सेवादल मैदान, बाजार तळ पेठ बीड),रात्री वाजता समता ज्योत, मंगळवार दि.१४ रोजी सकाळी अभिवादन रॅली ( सामाजिक न्याय भवन ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा), सायंकाळी ६ ते १२ छ.शिवाजी महाराज पुतळा ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक निघणार आहे.

# पंचशील-अष्टांगिक मार्गाने समाजात परिवर्तन

# भिक्खु विनयरक्खीता महाथेरो यांची धम्मदेसना

बीड ।प्रतिनिधी

बौद्ध धम्मात सांगितलेले पंचशील हे केवळ नियम नसून, एक सुसंस्कृत आणि शांततामय जीवन जगण्याचा पाया आहे. प्रत्येक व्यक्तीने पंचशीलाचे प्रामाणिकपणे पालन केले, तर समाजात नैतिकता, विश्वास आणि बंधुभाव दृढ होईल. तसेच अष्टांगिक मार्गाच्या आचरणातून विचार सकारात्मक होतील आणि जीवनाला खरी दिशा मिळेल, अशी धम्मदेसना पूज्य विपश्यनाचार्य भिक्खु विनयरक्खीता महाथेरो यांनी उपस्थित समाज बांधवाना दिली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ जयंती निमित्ताने बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे दि.५ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने रविवार दि.५ एप्रिल रोजी आयोजित धम्मदेसना कार्यक्रमात पूज्य विपश्यनाचार्य भिक्खु विनयरक्खीता महाथेरो बोलत होते.यावेळी भिक्खु धम्मशिल महाथेरो, भिक्खु पय्यावर्धन, भिक्खु ज्ञानबोधी, भिक्खु अमोलरत्न, बुद्धबोधी तर प्रमुख पाहुणे म्हणून सत्यशोधक ओबीसी परिषदेचे अध्यक्ष संदीप उपरे , संपादक नितीन मुजमुले, सुभाष गायकवाड, धर्मराज मुजमुले उपस्थित होते.धम्मदीसना कार्यक्रमाचे प्रास्ताविक दयानंद सरपते, सूत्र संचालन प्रा.पांडुरंग सुतार यांनी तर आभार इंजि. स्वप्नील चोपडे यांनी केले. दरम्यान जयभीम महोत्सवात साजरा होणाऱ्या सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी उपस्थित रहावे. असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.





### जाहीर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१३२/२०२६**
**भागवत तिर्थप्रसाद गाडे** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय, घाटसावळी ता.जि.बीड**

पहा.

**१. भागवत तिर्थप्रसाद गाडे, रा.बकरवाडी ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञा मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन **भागवत तिर्थप्रसाद गाडे** यांचा **दिनांक १०.०६.१९८९** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे **जन्म नोंद** जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यांची जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **घाटसावळी** ता.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून **जन्म** प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु **जन्म नोंद** ग्रामपंचायत कार्यालय **रा.घाटसावळी ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.११.०३.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारिख ११.०४.२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

### जाहीर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.४३५/२०२६**
**नम्रता पि.गणेश गाडे** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय, घाटसावळी/बकरवाडी ता.जि.बीड**

पहा.

**१. नम्रता गणेश गाडे, रा.बकरवाडी ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञा मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन **नम्रता गणेश गाडे** यांचा **दिनांक २५.१०.२००५** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे **जन्म नोंद** जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यांची जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **घाटसावळी** ता.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून **जन्म** प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु **जन्म नोंद** ग्रामपंचायत कार्यालय **रा.घाटसावळी ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०६.०३.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारिख ०६.०४.२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-६९ दि.०६.०४.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रामेश्वर उत्तमराव पिठोरे, रा.वडीलासुरा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मयत आई** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलबधता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुमनबाई उत्तमराव पिठोरे | आई | ०३.०२.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०६/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२८६ दि.०६.०४.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **कैफ रईस मोमीन, रा.जामखेड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलबधता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कैफ रईस मोमीन | स्वतः | २६.१०.२००५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०६/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२८५ दि.०६.०४.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रईस ईस्माईल मोमीन रा.जामखेड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलबधता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रईस इस्माईल मोमीन | स्वतः | ०१.०१.१९७६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलबधता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०६/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८८ दि.०६.०४.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **कृष्णा श्रीखंड शिंदे, रा.गोंदी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलबधता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कृष्णा श्रीखंड शिंदे | स्वतः | ०१.०७.१९६४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलबधता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २०५/२०२६**
**रुख्मिनबाई प्र. आंबादास घाटुळ व इतर**
**(मार्फत ॲड. जी. एस. डोईफोडे, गेवराई)**

अर्जदार -

१. रुख्मिनबाई भ्र. आंबादास घाटुळ,वय ७२ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. काठोडा ता. गेवराई जि. बीड.

२. अरुणाबाई भ्र. विठ्ठल गायके, वय ५३ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. गौंडगांव ता. गेवराई जि. बीड.

३. लंकाबाई पि. आंबादास घाटुळ, वय ५१ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. काठोडा ता. गेवराई जि.बीड.

४. सिंधुबाई भ्र. दत्तात्रय थोटे, वय ४९ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. चौंडाळा ता. पैठण जि.छ. संभाजीनगर.

५. मिना भ्र. उत्तम तिष्टक,वय ४७ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. काठोडा ता. गेवराई जि. बीड.

६. खंडु पि. आंबादास घाटुळ, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. काठोडा ता. गेवराई जि. बीड.

७. दत्तात्रय पि. आंबादास वय ४३ वर्षे, धंदा घाटुळ, शेत शेती, रा. काठोडा ता. गेवराई जि.बीड.

ज्याअर्थी मयत आंबादास नाथा घाटुळ, रा. काठोडा ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक ०२/१०/२०२५ रोजी रा. काठोडा ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. सदरहू मयताच्या नावे खालीलप्रमाणे रक्कम जमा आहे.

| अ.क्र. | बँकेचे नाव / कंपनीचे नाव /पतसंस्थेचे नाव | क्रमांक बचत खाते क्र. | रूपये पै. |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा जातेगांव ता.गेवराई जि.बीड | ८०००५३७९६२१ | रु.५६२४९.३३/- अक्षरी छप्पन हजार दोनशे एकोणपन्नास रूपये आणि तेहतीस फक्त |

वरील रक्कम मिळणे कामी अर्जदार यांना उत्तराशिकार प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **अंबादास नाथा घाटुळ** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.३१/०३/२०२३** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०६/०५/२०२६**

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई
शिक्का
आदेशावरून स्वाक्षरित/- **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि येथील२ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक: २२३/२०२६**
**बाबासाहेब बापुराव आर्डे व इतर वि.निरंक**
**(मार्फत ॲड.ए.बी.जोशी, गेवराई)**

अर्जदार १.बाबासाहेब बापुराव आर्डे, वय-६० वर्षे, धंदा-शेती, रा.राजपिंपरी ता.गेवराई जि.बीड, २. बंडु पि.बापुराव आर्डे, वय-५० वर्षे, धंदा-शेती, रा.राजपिंपरी ता.गेवराई जि.बीड

ज्याअर्थी मयत बापुराव पि.गंगाराम आर्डे व सुभद्राबाद भ्र.बापुराव आर्डे, दोन्ही रा.राजपिंपरी ता.गेवराई जि.बीड हे अनुक्रमे दि.१५.१२.२०२४ व दि.१३.११.२०२४ रोजी दोन्ही रा.राजपिंपरी ता.गेवराई जि.बीड येथे मयत झाले आहेत. अर्जदार यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **बापुराव पि.गंगाराम आर्डे व सुभद्राबाद भ्र.बापुराव आर्डे,** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.०८/०८/२०२६** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०८/०५/२०२६**

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई
शिक्का
आदेशावरून स्वाक्षरित/- **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**कोर्ट. विद्यमान. श्री. रमेश पागोटे, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, घनसावंगी यांचे न्यायालय, घनसावंगी**
**रा.मा.क्रं. / जन्म-मृत्यु नोंद/२०२६/२७/२७२**
**मौजे- पिरगैबवाडी ता. घनसावंग, जि. जालना**

### जाहीरनामा

मौजे -पिरगैबवाडी, तह. घनसावंगी, जि. जालना येथील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार श्री./श्रीमती/कुं. जफर सत्तार शेख, राह.पिरगैबवाडी, तह. घनसावंगी, जि.जालना यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून यांनी त्याचे मुलगा नावे फुरखान जफर शेख याचा जन्म दि.१२/०५/२०१३ रोजी मौजे पिरगैबवाडी, येथे जन्माची नोंद घेण्यात आलेली नसल्याने नमुद करुन ग्रामपंचायत, पिरगैबवाडी, ता.घनसावंगी, जि. जालना येथे जन्माचे प्रमाणपत्र नोंद करण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जदार यांना स्वताःचे नावाचे जन्माचे प्रमाणपत्र नोंद आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उजर घ्यावयाचे असतील त्यांनी पंधरा दिवसा पर्यत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, घनसावंगी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखी स्वरुपात मुलगाः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**स्वाक्षरित/-**
**तालुका दंडाधिकारी, घनसावंगी**
**कार्यकारी दंडाधिकारी, घनसावंगी**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २३३/२०२६**
**बेबी भ्र. अशोक आरगडे निरंक**
**(मार्फत ॲड के. एल. पिसाळ, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे राज अशोक आरगडे, रा. बागपिंपळगाव, ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक ३०/०१/२०२५ रोजी बागपिंपळगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार बेबी भ्र. अशोक आरगडे, वय ५७ वर्षे, धंदा घरकाम, रा. बागपिंपळगाव ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हिते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत राज अशोक आरगडे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - ०७/०५/२०२६

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई
शिक्का
आदेशावरून स्वाक्षरित/- **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक: २२८/२०२६**
**अविद्या विरूध्द - निरंक**
**(मार्फत ॲड.एस.एम. काळे)**

ज्याअर्थी मयत नामे पाराजी पि. रंगनाथ पौळ हे दिनांक १४.०६.२०२५ रोजी सुशी ता.गेवराई जि.बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार

१. अविद्या भ्र. पाराजी पौळ वय ५४ वर्षे धंदा-शेती रा. सुशी गेवराई जि.बीड २ सुखराम पि. पाराजी पौळ वय ३६ वर्षे धंदा-शेती रा. सुशी गेवराई जि. बीड ३.योगेश पि. पाराजी पौळ वय ३४ वर्षे धंदा-शेती रा. सुशी गेवराई जि.बीड ४.संतोष पि. पाराजी पौळ वय ३२ वर्षे धंदा शेती रा. सुशी गेवराई जि. बीड यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **पाराजी पि.रंगनाथ पौळ** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०७/०५/२०२६**

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई
शिक्का
आदेशावरून स्वाक्षरित/- **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २२०/२०२६**
**मंगल भ्र. अविनाश बेदरे व इतर वि. निरंक**
**(मार्फत ॲड. जी. एस. डोईफोडे, गेवराई)**

अर्जदार

१. मंगल प्र. अविनाश बेदरे, वय २७ वर्षे, धंदा शेती व परकाम, रा. बेलगांव ता. गेवराई जि.बीड,

२. आरोही पि. अविनाश बेदरे, वय ०६ वर्षे, अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क. १. मंगल भ्र. अविनाश बेदरे, रा. सदर,

३. अनन्या पि. अविनाश बेदरे, वय ०४ वर्षे, अज्ञान अ.पा.क.आई अर्जदार क. १. मंगल भ्र. अविनाश बेदरे, रा. सदर.

४. शंभु पि. अविनाश बेदरे, वय ०२ वर्षे, अज्ञान अ.पा.क.आई अर्जदार क. १. मंगल प्र. अविनाश बेदरे, य. सदर.

५. सुधाकर पि. काशिनाथ बेदरे, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. बेलगांव ता. गेवराई जि. बीड.

६. निर्मला भ्र. सुधाकर बेदरे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. बेलगांव ता. गेवराई जि.बीड.

ज्याअर्थी मयत अविनाश पि. सुधाकर बेदरे, रा. बेलगांव ता. गेवराई जि. बीड है/हया दिनांक २१/०१/२०२५ रोजी रा. विलासराव देशमुख शासकीय हॉस्पीटल, लातुर येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ ते ६ यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वाग्माचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर मदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत अविनाश पि. सुधाकर बेदरे, रा. बेलगांव ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४/०४/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०८/०५/२०२६

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई
शिक्का
आदेशावरून स्वाक्षरित/- **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# मैदान गाजवले मनेही जिंकली महसूल क्रीडा स्पर्धेत जालना जिल्ह्याचा डंका

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या प्रत्यक्ष सहभागाने खेळाडूंमध्ये संचारले नवचैतन्य

जालना / शेख फारुक

परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या अश्ववेध मैदानावर आयोजित छत्रपती संभाजीनगर विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा' जालन्याच्या अष्टपैलू कामगिरीने गाजली. दि.३ ते ५ एप्रिल २०२६ दरम्यान पार पडलेल्या या स्पर्धेत जालना जिल्ह्याने केवळ मैदानी खेळातच नव्हे, तर सांस्कृतिक कार्यक्रमातही बाजी मारत प्रेक्षक आणि परीक्षकांची मने जिंकली. रविवार दि.५ एप्रिल २०२६ रोजी रात्री उशिरापर्यंत चाललेल्या पारितोषिक वितरण समारंभात जालना जिल्ह्याला विभागीय सर्वसाधारण चॅम्पियनशिपमध्ये द्वितीय उपविजेता म्हणून गौरविण्यात आले.

जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी या स्पर्धे दरम्यान वेळोवेळी स्वतः मैदानावर उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढविला. त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमुळे खेळाडूंमध्ये एक वेगळेच नवचैतन्य संचारले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या या प्रोत्साहनामुळेच खेळाडूंनी आपले सर्वस्व पणाला लावून विविध खेळांमध्ये विजयश्री खेचून आणला. या स्पर्धेचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचा खेळातील प्रत्यक्ष सहभाग. केवळ मार्गदर्शक म्हणून न थांबता, जिल्हाधिकारी मित्तल स्वतः टेबल टेनिसच्या मैदानात उतरल्या. त्यांनी हाती बॅट घेत चपळाईने केलेले सर्व्हिस आणि स्मॅश पाहून उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. त्यांच्या या स्पोर्ट्समन स्पिरीटमुळे जालना संघातील खेळाडूंमध्ये वेगळेच नवचैतन्य निर्माण झाले. केवळ प्रशासकीय कामातच नव्हे तर खेळाच्या मैदानातही आपण तितकेच तत्पर आहोत, हे त्यांनी टेबल टेनिसच्या स्पर्धेत उतरून दाखवून दिले. प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळतानाच खेळाप्रती असलेली त्यांची ही ओढ खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरली. त्याच बरोबर जालना महसूल विभागातील अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ आणि निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत





हदगल सांघिक क्रीडा प्रकारात विजयी ठरले असून त्यांनी स्पर्धेच्या कालावधीत सर्व संघ हाताळण्याचे काम नियोजनबध्द व कुशलपणे पार पाडले. तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देखील क्रीडा स्पर्धेत सहभाग घेत विजयाचा पाया रचला आहे.

सांस्कृतिक सादरीकरणाने जिंकली मने

केवळ मैदानी खेळातच नव्हे तर सांस्कृतिक व्यासपीठावरही जालना जिल्ह्याने आपली छाप पाडली. सांस्कृतिक कार्यक्रमात जालन्याच्या चमूने सादर केलेल्या कलाविष्काराला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. महसूल विभागातील अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या या कलागुणांचे सर्वत्र कौतुक होत आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जालना जिल्ह्याचा संघ या विभागीय क्रीडा स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी करत विविध स्पर्धा प्रकारात जालन्याचे नाव उंचावले आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व कलाकार, खेळाडूंचे कौतुक करत अभिनंदन केले.

वैयक्तिक खेळ प्रकारात बुध्दीबळ प्रथम क्रमांक प्रशांत हरिशचंद्रे, टेबल टेनिस एकेरी प्रथम क्रमांक रवि वैद्य तर दुहेरीत द्वितीय क्रमांक शशिकांत हदगल व रवि वैद्य, बॅडमिंटन दुहेरी द्वितीय क्रमांक कृष्णा मुजमुले व सोमनाथ सर फळे, १०० मिटर धावणे द्वितीय क्रमांक राहुल साळवे, ४०० मिटर धावणे प्रथम क्रमांक योगेश पोटे, उंच उडी प्रथम क्रमांक कृष्णा सोनवणे, गोळा फेक प्रथम क्रमांक राजेश खांडेभराड, थाळी फेक तृतीय क्रमांक प्रकाश जाधव, जलतरण ब्रेस्ट स्ट्रोक प्रथम तर फ्री स्टाईल द्वितीय क्रमांक स्वप्निल चौधरी, जलतरण प्रथम क्रमांक अनिरुध्द झुमडे, ४५ वर्षावरील पुरुष थाळी फेक द्वितीय क्रमांक प्रकाश जाधव, टेबल टेनिस मिश्र प्रथम क्रमांक प्रणाली तायडे व शशिकांत हदगल, ४५ वर्षावरील पुरुष लॉन टेनिस एकेरी सुनिल केंधळे तर दुहेरीत सुनिल केंधळे व रमेश मिसाळ, कॅरम महिला एकेरी द्वितीय क्रमांक सरिता गुंजकर, महिला बॅडमिंटन एकेरी द्वितीय क्रमांक शितल सराटे तर दुहेरी शितल सराटे आणि रश्मी पिलडेकर,१०० मिटर व २०० मिटर धावणे प्रथम क्रमांक मोहिनी कोळसे, ४०० मिटर धावणे प्रथम क्रमांक निता मुळूक, उंच उडी प्रथम क्रमांक तत्पर्ता पाटील, लांब उडी प्रथम क्रमांक मोहिनी कोळसे, गोळा फेक द्वितीय क्रमांक मोहिनी कोळसे, थाळी फेक द्वितीय क्रमांक पुजा चव्हाण, पुरुष सांघिक खेळ प्रकारात ४ु १०० रिले प्रथम क्रमांक, महिला सांघिक खो खो प्रथम क्रमांक, महिला सांघिक खेळ प्रकारात ४ु१०० रिले प्रथम क्रमांक तर ४ु ४०० रिले प्रथम क्रमांक पटकाविलेला आहे. याप्रमाणे एकुण २२१ क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा प्रकारात जालना महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

# बीड पोलिसांचा संवाद वरील क्यू आर कोड प्रकल्प यशस्वी उपक्रम

नागरिकांना वापराचे पोलिसांचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस दलामार्फत नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने 'संवाद वरील क्यू आर कोड प्रकल्प' हा उपक्रम दिनांक ०६ फेब्रुवारी २०२५ पासून प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना सुलभ आणि जलद पद्धतीने तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

संवाद QR कोड

या प्रकल्पाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत एकूण ४००० तक्रारी/ फीडबॅक प्राप्त झाले आहेत आणि सर्व तक्रारींवर २४ तासांच्या आत कार्यवाही करून त्यांचे निराकरण करण्यात आले आहे. यामुळे पोलीस प्रशासनावरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाला असून, बीड पोलीस नागरिकाभिमुख सेवा देण्यात यशस्वी ठरत आहेत.

या उपक्रमांतर्गत वरील क्यू आर कोड विविध सार्वजनिक ठिकाणी, पोलीस ठाण्यांच्या परिसरात, सोशल मीडिया साईट्सवर तसेच शासकीय कार्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नागरिकांना आपल्या मोबाईलद्वारे वरील क्यू आर कोड स्कॅन करून थेट ऑनलाइन तक्रार नोंदविता येते. त्यामुळे पोलीस ठाण्यात प्रत्यक्ष जाण्याची गरज न पडता वेळ व श्रमांची बचत होत असून तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया अधिक सोपी व सुलभ झाली आहे. प्राप्त प्रत्येक तक्रारीची गांभीयनि दखल घेऊन संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी त्वरित कार्यवाही करीत आहेत. तक्रारींच्या स्वरूपानुसार फिर्यादींशी थेट संपर्क साधून आवश्यक ती चौकशी व योग्य कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक बीड, श्री नवनीत कावत यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, 'संवाद वरील क्यू आर कोड प्रकल्प' हा नागरिकांसाठी तयार केलेला सोपा आणि प्रभावी मार्ग आहे. कोणतीही समस्या, तक्रार किंवा सूचना असल्यास वरील क्यू आर कोड स्कॅन करून त्वरित नोंदवावी. तसेच कोणतेही बेकायदेशीर कृत्ये, अवैध धंदेबाबत माहिती देण्यासाठीही या माध्यमाचा वापर करता येईल आणि माहिती देणाऱ्या नागरिकाची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. बीड पोलीस नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असून नागरिकांचा सहभाग आणि विश्वास हीच आमची ताकद आहे. बीड पोलीस दलाकडून सर्व नागरिकांना या उपक्रमाचा जास्तीत जास्त वापर करून स्वतःच्या समस्या वेळेत सोडवून घेण्याचे तसेच सुरक्षित व जबाबदार समाज घडविण्यात सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# गेवराईत भाजपा पक्ष स्थापना दिनी भाजपने काढली विराट मोटरसायकल रॅली

## माजीमंत्री बदामराव पंडित यांनी दाखवला झेंडा

गेवराई ।प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी पक्ष स्थापना दिनानिमित्त दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानापासून भाजपच्या कार्यकर्त्यांनी विराट मोटार सायकल रॅली काढली. या रॅलीला माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी झेंडा दाखवला.



भारतीय जनता पार्टी पक्ष स्थापना दिनानिमित्त गेवराईतील माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानापासून भारतीय जनता पार्टीचा ध्वज हातात घेऊन ज्येष्ठ आणि युवा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विराट मोटरसायकल रॅली काढली. या रॅलीला भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी झेंडा दाखवून सुरुवात केली. बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवानेते शिवराज पवार, युवानेते रोहित पंडित, युवानेते यशराज पंडित यांच्यासह माजी तालुकाध्यक्ष प्रकाशराव सुरवसे, ड सुरेशराव हात्ते, गेवराई विधानसभा भाजप समन्वयक श्रीकांत सानप, तालुका अध्यक्ष सचिन दाभाडे, माजी सभापती भीष्मचार्य दाभाडे, माजी सभापती पंढरीनाथ लगड, न प सभापती शेख शेहदाद, न प सभापती महेश सौंदरमल, नगरसेवक राजेश टाक, नगरसेवक प्रथमेश एकनाथ लाड, नगरसेवक सज्जाद भाई बागवान, माजी सरपंच संतराम काळे, नगरसेवक पिंटू काकडे,

भाजप पूर्व मंडळ अध्यक्ष राजेश पवार, संतोष थोरात, विकास पवार, अशोकराव शिंदे, अंबादास पिसाळ, दुरेश चिकने, रणजीत शर्मा, कृष्णा बारगजे, सुनील ढाकणे, राजाभाऊ रोमन, तांगडे मामा, शेख सुलेमान, बबलू खराडे, सरपंच मुकुंद बाबर, विलास शिंदे, बदाम पौळ, पवार, शेख सिराज, बाळासाहेब सानप, पप्पू कोठेकर, अमोल सुतार, संतोष दायमा, कैलास राठोड, माजी सभापती गीताराम डोंगरे, ड डिंगरे, चंद्रसेन जाधव, भागवतराव ढेंबरे, सुनील जाधव, सुनील कांडेकर आदींसह शेकडो भाजपा पदाधिकारी या मोटरसायकल रॅलीमध्ये सहभागी झाले होते. ही मोटरसायकल रॅली बदामराव पंडित यांचे निवासस्थानापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक, शास्त्री चौक, गेवराई शहर मिरवणूक मार्ग, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, संत सेवालाल महाराज चौक ते भाजपा कार्यालय कोल्हेर रोड पर्यंत रॅली काढण्यात आली.

# शाळांची प्रत्यक्ष पडताळणी पुढे ढकलावी – जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघ



लातूर ।प्रतिनिधी

राज्यातील शाळांची प्रत्यक्ष पडताळणी ११ ते २२ एप्रिल २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. या कालावधीत पॅट परीक्षेसह ९वी व ११ वीच्या परीक्षांचेही आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे शाळांची प्रत्यक्ष पडताळणी पुढे ढकलण्यात यावी, अशी मागणी लातूर जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघाच्यावतीने शिक्षण उपसंचालकांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनावर सचिव प्राचार्य बाबूराव जाधव, सरचिटणीस प्रा. गोविंद घार, कोषाध्यक्ष प्राचार्य डी. एन. केंद्रे, सहसचिव पी. एन. बंडगर, उपाध्यक्ष जे. जी. सगरे, बी. जी. चोले, एम. एस. पात्रे, एस. व्ही. परगे, के. एस. क्षीरसागर, कालिदास माने आदींच्या स्वाक्षर्या आहेत.

# जयभिम महोत्सवात शेकडो रक्तदात्यांचे रक्तदान

## रक्तदानाने गरजुवंत रूग्णांचे प्राण वाचविण्याचे काम केले – डॉ.उल्हास गंडाळ

बीड/प्रतिनिधी

रक्ताचा तुटवडा पाहता,शेकडो रक्तदात्यांनी रक्तदान करुन गरजुवंत रूग्णांचे प्राण वाचविण्याचे काम केले आहे. असे समाज उपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जावेत, असल्याचे प्रतिपादन डीएचओ डॉ.उल्हास गंडाळ यांनी व्यक्त केले.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्यावतीने सोमवार (दि.६) एप्रिल रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. हा रक्तदान शिबीराचा कार्यक्रम बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी डीएचओ डॉ.उल्हास गंडाळ बोलत होते. यावेळी जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. सचिन शेकडे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी शेख रौफ, पत्रकार वैभव स्वामी आदी मान्यवर उपस्थित होते.गेल्या अनेक वर्षापासून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून प्रत्येक वर्षी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येते. त्या अनुषंगाने सोमवारी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबीरामध्ये शेकडो रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले.या रक्तदानाच्या शिबीरासाठी जिल्हा रूग्णालयातील डॉ.अंकिता पाटील, डॉ.ऊर्जा पाटील, पल्लवी बनसोडे, ब्रदर्स संतोष गायकवाड, टेक्निशियन सचिन सत्कर, दादा कुमकर, दिनकर सुपेकर, यांनी रक्तदानाची वैद्यकिय जबाबदारी पार पाडली.हा रक्तदान शिबीराचा कार्यक्रम यशस्विरित्या पार पाडण्याकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती तसेच रक्तदान शिबीर समिती यांच्यासह आदी कार्यकर्त्यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

# दिशा अभियानात लातूर जिल्ह्यातील चार शाळांचा राज्यस्तरावर गौरव

लातूर ।प्रतिनिधी

दिशा अभियानाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल लातूर जिल्ह्यातील चार शाळांची राज्य स्तरावर निवड करण्यात आली आहे. या निवडीचे प्रमाणपत्र जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांच्या हस्ते संबंधित मुख्याध्यापकांना प्रदान करण्यात आले.

या अभियानाअंतर्गत लातूर येथील संत गाडगेबाबा अनाथ मतिमंद मुलांचे बालगृह, जीवन विकास प्रतिष्ठान मतिमंद विद्यालय, पांडूरंग निवासी मतिमंद विद्यालय आणि चाकूर तालुक्यातील नळेगाव येथील संत गाडगेबाबा निवासी मतिमंद विद्यालय या शाळांचा समावेश आहे. वर्षभरात अभ्यासक्रम व अध्यापनात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल मुख्याध्यापक अण्णासाहेब कदम, भरत देवकते, शिवप्रसाद भंडारे आणि पंडित लव्हरे यांना राहुलकुमार मीना यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या गौरव सोहळ्याप्रसंगी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता डॉ. राजू गायकवाड, सहायक सल्लागार बाळासाहेब वाकडे आणि दिशा अभियानचे लातूर विभागीय समन्वयक साजिद मुल्ला यांची उपस्थिती होती.



# अवैध शस्त्र बाळगणाऱ्या युवकावर पोलिसांची कारवाई, धारदार शस्त्र जप्त

माजलगाव । प्रतिनिधी

शहरात अवैध शस्त्र बाळगून दहशत निर्माण करणाऱ्या एका २२ वर्षीय युवकावर माजलगाव शहर पोलिसांनी तत्परतेने कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी संबंधित युवकाकडून ९.५ इंच लांबीचे धारदार शस्त्र जप्त केले आहे. दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी माजलगाव शहर पोलीस पेट्रोलिंगवर असताना, शहरातील कुमार ड्रेसेस समोरील मुख्य रस्त्यावर एका युवकाची हालचाल संशयास्पद असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी तत्काळ त्या युवकाला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता, त्याच्या कमरेला पुठ्ठ्याच्या लाल कव्हरमध्ये लपवून ठेवलेले सुमारे ९.५ इंच लांबीचे धारदार शस्त्र आढळून आले.

या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या युवकाचे नाव कुणाल रमेश वाल्मीक (वय २२ वर्ष, रा. भिमनगर, माजलगाव) असे आहे. कुणाल वाल्मीक याच्या विरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९३/ २०२६ अन्वये शस्त्र अधिनियम कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस कर्मचारी मस्के (बकल नंबर ८६५) हे करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके तसेच पोलीस निरीक्षक



राहुल सुर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोलीस हवालदार विजय गायकवाड, अस्लम शेख आणि पोलीस कॉन्स्टेबल सुनील गवळी यांनी सहभाग घेतला.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# सौर ऊर्जा प्रकल्पामुळे शेतीसाठी दिवसा वीज उपलब्ध -खा.रजनीताई पाटील

## आनेगाव शिवारात सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ



केज/प्रतिनिधी

सौर ऊर्जा प्रकल्पामुळे स्थानिक शेतकऱ्यांना आधार मिळाला आहे. सौर ऊर्जा ही काळाची गरज आहे.शाश्वत विकासासाठी असे प्रकल्प उभारले पाहिजेत असे मत खा.रजनीताई पाटील यांनी केले त्या आनेगाव शिवारातील

केज सोलार प्रायव्हेट लिमिटेड २ मॅगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.प्रमुख उपस्थिती माजी मंत्री अशोकराव पाटील, माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील,गंगा माऊली साखर कारखान्याचे चेअरमन हनुमंत मोरे, पाटील,युसुफवडगाव पोलीस स्टेशनचे सपोनि मच्छिंद्रनाथ शेंडगे,युसुफ वडगाव महावितरणचे सहाय्यक अभियंता श्री हलकुडे,गंगा माऊली उद्योग समूहाचे प्रवीण मोरे,काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे,आदित्य ग्रीन एनर्जी लातूरचे जितेंद्र बजाज,अँड.अमित पाटील,तेजस्विनी पाटील,देविका पाटील, रेवती सोनवणे आदींच्या हस्ते प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला.यावेळी मांजरा प्रकल्प शाखाधिकारी ए.बी.गिरी बी.एस.ठोंबरे,आनेगावचे चेअरमन रवी इंगळे, शंकरराव इंगळे,माळेगाव चे सरपंच कैलास गव्हाणे बाळासाहेब नांदे, अंगदराव हंडीबाग, बालाजी इंगळे,भारत इंगळे,अंकुश हांडीबाग, शिवाजी इंगळे,श्रीराम इंगळे,अंकुश इंगळे, श्रीराम नांदे,गोविंद दोडके,अरविंद मोरे, जयसिंग राऊत, ज्योतीराम सावंत, शिवरुद्र चोपणे,दत्ता निकम,पिंटू कोरसाळे, राम इखे,ज्ञानोबा देवकर, नागनाथ कोरसाळे, नरसिंग सोनवणे,उप सरपंच रवी सोनवणे, प्रशांत आदनाक, आबासाहेब शिंदे,यावेळी बोलताना अशोकराव पाटील म्हणाले की,

सर्वांनी एकत्र येऊन काम केल्यास शेतकरी समृद्ध होईल असे मत व्यक्त केले.आनेगाव गावकऱ्यांच्या वतीने शिवारात प्रकल्प उभा केल्यामुळे खा.रजनीताई पाटील यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी बोलताना राहुल सोनवणे म्हणाले की,खा. रजनीताई पाटील यांचा या भागाशी ऋणानुबंध आहे.या भागातील शेतकऱ्यांना सौर ऊर्जा प्रकल्पामुळे दिवसभर विद्युत पुरवठा होणार असल्याने त्यांच्या जीवनात समृद्धी येईल असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमास परिसरातून शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी केज सोलार प्रायव्हेट लिमिटेड व्यवस्थापन यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. झाकीर हुसेन हायस्कूलच्या मुख्याध्यापकांचा 'रेल्वे' कारभार

## परभणी ते परतूर 'अप-डाऊन'मुळे शाळेकडे दुर्लक्ष, पालकांकडून बदलीची मागणी

परतूर ।प्रतिनिधी

परतूर येथील डॉ. झाकीर हुसेन हायस्कूलमधील शैक्षणिक वातावरणाचा पुरता बोजवारा उडाला आहे. शाळेचे मुख्याध्यापक कर्तव्यावर वेळेत उपस्थित न राहता रेल्वेच्या वेळापत्रकानुसार आपली 'ड्यूटी' बजावत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. परभणी ते परतूर असा दररोज रेल्वेने प्रवास करणाऱ्या या मुख्याध्यापकांमुळे शाळेच्या शिस्तीला हरताळ फासला जात असून, संतापलेल्या पालकांनी आता त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची किंवा थेट बदली करण्याची मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुख्याध्यापक हे परभणीहून रेल्वेने ये-जा करतात. रेल्वे ज्या वेळी परतूर स्थानकावर पोहोचते, त्यानंतरच मुख्याध्यापक शाळेत दर्शन देतात आणि परतीच्या रेल्वेची वेळ झाली की शाळा सोडून निघून जातात. मुख्याध्यापकांचा




हा 'अप-डाऊन'चा सिलसिला गेल्या अनेक महिन्यापासून सुरू असून, त्यामुळे शाळेच्या कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे. विशेष म्हणजे, मुख्याध्यापकांसोबत शिक्षकांची एक मोठी फौजही याच रेल्वे प्रवासाच्या वेळेनुसार शाळेत येते आणि जाते. मुख्याध्यापक स्वतःच वेळेचे पालन करत नसल्याने शाळेतील इतर शिक्षकांवर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नाही. परभणीहून येणाऱ्या शिक्षकांची ही 'फौज' केवळ हजेरी लावण्यापुरती शाळेत येत असल्याची चर्चा पालक वर्गात आहे. मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या या मनमानी कारभारामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, वर्गांमध्ये नियमित अध्यापन होत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. मुख्याध्यापक जर रेल्वेच्या वेळापत्रकानुसार शाळा चालवणार असतील, तर त्यांनी या पदावर राहू नये, असा संतप्त सवाल पालकांनी उपस्थित केला आहे. पालकांनी अनेकदा याकडे लक्ष वेधले, परंतु परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नाही. त्यामुळे आता या बेजबाबदार मुख्याध्यापकाची तात्काळ बदली करावी, अन्यथा शिक्षण विभागाच्या कार्यालयावर धडक मोर्चा काढण्याचा इशारा पालकांनी दिला आहे.शाळेतील या गैरप्रकारामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले आहे. वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी आणि शिक्षण विभागाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषी मुख्याध्यापक व शिक्षकांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. आता प्रशासन या 'रेल्वे वेळेनुसार' चालणाऱ्या शाळेवर काय लगाम लावणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूलच्या

## टॉड्लर्स व्हिले प्री-स्कूलचा पदवीदान समारंभ (ग्रॅज्युएशन डे) उत्साहात

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

दर्जेदार शिक्षणासाठी बीड जिल्ह्यातील एक अग्रगण्य शिक्षण संस्था म्हणून सर्वत्र ओळखल्या जाणार्या श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूलच्या टॉड्लर्स व्हिले प्री-स्कूलचा पदवीदान समारंभ (ग्रॅज्युएशन डे) नुकताच उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे दर्शन घडले.

अंबाजोगाईतील टॉड्लर्स व्हिल प्री-स्कूलने आपला बालवाडी पदवीदान समारंभ (ग्रॅज्युएशन डे) नुकताच अत्यंत उत्साहात आणि आनंदाने साजरा केला. या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपली प्री-स्कूलची वाटचाल पूर्ण करून शिक्षणाच्या एका नवीन टप्प्याकडे पहिले पाऊल टाकले. त्यांच्या आयुष्यातील हा महत्त्वाचा टप्पा अधोरेखित करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी दीपप्रज्ज्वलन, सरस्वती पूजन आणि प्रार्थना करण्यात आली. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी तर व्यासपीठावर डॉ.अर्चना थोरात, प्रा.सविता बनाळे, डॉ.हिरा बजाज, उद्योजक धनराज सोळंकी, माजी प्राचार्य चंद्रकांत गायकवाड, मुख्याध्यापक विनायक मुंजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सोहळ्यात नर्सरी, एलकेजी, युकेजी उत्तीर्ण होवून पुढील वर्गात प्रवेशीत झालेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ग्रॅज्युएशन पदवी प्रमाणपत्र आणि दीक्षांत टोपी देऊन गौरविण्यात आले. यावेळी आपल्या शैक्षणिक प्रवासातील पहिले पाऊल यशस्वीरीत्या पूर्ण केल्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. पाहुण्यांचा परिचय आणि सत्कारानंतर युकेजी ए, बी, सी ग्रुपमधील विद्यार्थ्यांचे ग्रॅज्युएशन प्रमाणपत्र वितरण व सामूहिक छायाचित्रण करण्यात आले. तर युकेजी ए ग्रुपच्या आनंदी अतुल वैद्य (विद्यार्थिनी), रविकुमार पवार (पालक), शरद शिंदे (पालक), श्री.भताने (पालक), युकेजी बी ग्रुपच्या सार्थक कुंदनसिंग शिसोदे (विद्यार्थी), श्रीमती अश्विनी डेरनासे (पालक), गणेश तौर (पालक) आणि युकेजी सी ग्रुपच्या जिजा बालाजी केसारे (विद्यार्थिनी), श्रीमती दिपाली चाटे (पालक) यांनी आपले अभिप्रायपर मनोगत व्यक्त केले. तर त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी विचार मांडले. अध्यक्षीय समारोप संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत



मोदी यांनी केला. उपस्थित पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाची सुरूवात उपस्थित सन्माननीय अतिथी, पालक आणि शिक्षकांच्या स्नेहपूर्ण स्वागताने झाली. पदवीदान समारंभासाठी खास परिधान केलेले आकर्षक ग्रॅज्युएशन ड्रेस यात कॅप्स (टोपी) आणि गाऊन्स (झगे) परिधान केल्यामुळे हे चिमुकले पदवीधर अत्यंत आत्मविश्वासपूर्ण आणि उत्साही दिसत होते. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध आनंददायी सादरीकरणांची मालिका पार पडली. यामध्ये नृत्य, गाणी आणि छोट्या-छोट्या सादरीकरणांचा समावेश होता, ज्यातून त्यांनी वर्षभर आत्मसात केलेले ज्ञान आणि त्यांच्या सुप्त कलागुणांचे दर्शन घडले. व संपूर्ण वातावरण भारावून गेले. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे पदवीदान समारंभ हा भाग होता. ज्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला व्यासपीठावर बोलावून ग्रॅज्युएशन पदवी प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. चिमुकल्यांच्या आणि त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावरील अभिमानाचे हास्य पाहून तो क्षण खरोखरच विशेष आणि अविस्मरणीय ठरला. संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, सौ.डिंपल संकेत मोदी यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाबद्दल पालकांनी आपला आनंद आणि समाधान व्यक्त केले. आपल्या मुलांचे योग्य संगोपन करण्यासाठी आणि अशा एका सुंदर व अर्थपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी न्यू व्हिजन पब्लिक स्कूलच्या टॉड्लर्स व्हिले प्री-स्कूल या शाळेच्या शिक्षकांनी घेतलेल्या परिश्रमाचे त्यांनी विशेष कौतुक केले. पालकांकडून मिळालेल्या या सकारात्मक फिडबॅक आणि उत्साहवर्धक प्रतिक्रियांनी कार्यक्रमाच्या यशात मोलाची भर घातली. शिक्षकांनीही याप्रसंगी काही प्रेरणादायी विचार मांडले. तसेच विद्यार्थ्यांचे प्रयत्न आणि पालकांचा शाळेला लाभलेला अखंड पाठिंबा याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वेदांत शिंदे व सार्थक कोल्हे यांनी केले. तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी हातभार लावला, त्या सर्वांचे आभार शाळेच्या ओम हावळे या विद्यार्थ्याने मानले. एकंदरीत, पदवीदान समारंभाचा सोहळा हा एक अविस्मरणीय आणि हृदयस्पर्शी प्रसंग ठरला. जो विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी आनंद, अभिमान आणि कर्तृत्वाच्या भावनेने ओतप्रोत भरलेला होता. याप्रसंगी शाळेचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

# चिकणी इनामी परिसरात महावितरणची तत्काळ धाव; आता कायमस्वरूपी समाधानासाठी 'नवीन पोल'ची आर्त साद!

परतूर ।प्रतिनिधी

परतूर शहरातील लड्डा कॉलनीसमोरील चिकणी इनामी परिसरात मशिदीसमोरच लटकणाऱ्या 'मृत्यूच्या तारां'बाबत 'दैनिक समर्थ राजयोग ने वृत्त प्रसिद्ध करताच महावितरण प्रशासन खडबडून जागे झाले आहे. या बातमीची दखल घेत महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन प्राथमिक दुरुस्ती केली आहे. या तत्परतेबद्दल नागरिकांनी प्रशासनाचे आभार मानले असून, महावितरण साहेबांनी येथे एक नवीन पोल बसवून दिला, तर आमच्यावर मोठे उपकार होतील, अशी विनंतीवजा मागणी चिकणी इनामी परिसरातील नागरिकांनी केली आहे. चिकणी इनामी परिसरात मशिदीच्या अगदी मुख्य प्रवेशद्वारासमोरच विद्युत वाहिनीच्या तारा अत्यंत खाली लटकत होत्या. यामुळे नागरिक आणि लहान मुलांच्या जीविताला धोका निर्माण झाला होता. या गंभीर विषयावर 'दैनिक समर्थ राजयोग ने वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी विलंब न लावता तांत्रिक काम पूर्ण केले आणि लोंबकळणाऱ्या तारा ओढून धोका तात्पुरता दूर केला. महावितरणने दाखवलेल्या या संवेदनशीलतेमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत कर्मचाऱ्यांचे आभार मानले आहेत.



सध्या जरी धोका टळला असला, तरी या भागातील वाढती लोकसंख्या आणि विजेची गरज पाहता येथे कायमस्वरूपी मजबुतीकरण आवश्यक आहे. येथील विद्युत तारांचा झोल वारंवार खाली येत असल्याने नागरिकांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना साकडे घातले आहे.

महावितरणने बातमीची दखल घेऊन तत्काळ काम केले, त्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत. मात्र, या ठिकाणी तारांना आधार देण्यासाठी एक नवीन वीज पोल (खांब) बसवणे तांत्रिकदृष्ट्या गरजेचे आहे. महावितरण साहेबांनी जर सहानुभूतीपूर्वक विचार करून येथे नवीन पोल मंजूर करून दिला, तर चिकणी इनामी परिसरातील नागरिकांवर त्यांचे मोठे उपकार होतील आणि सुरक्षेचा प्रश्न कायमचा मिटेल.

- नागरिक, चिकणी इनामी परतूर

परिसर आता महावितरणचे वरिष्ठ अधिकारी नागरिकांच्या या विनंतीला मान देऊन येथे नवीन पोल कधी बसवतात, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.



आष्टी - शहरातील प्रसिद्ध व्यापारी अमोलशेठ भंडारी यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, इंजि. पी. बी. बोडखे, पत्रकार शरद रेडेकर दिसत आहेत.

# सामाजिक न्याय भवन येथे पोलीस ठाणे स्थलांतरित करू नका - आंबेडकर प्रेमी

बीड ।प्रतिनिधी

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे शिवाजीनगर पोलीस ठाणे स्थलांतरित करण्याच्या हालचालींना विरोध होत असून, ही प्रक्रिया तात्काळ थांबवावी अशी मागणी सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सामाजिक न्याय भवनाच्या काही भागात पोलीस ठाणे सुरू करण्यासाठी प्रशासनाकडून हालचाली सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. यासंदर्भात पोलीस अधिकाऱ्यांनीही स्थळ पाहणी केल्याचे सांगितले जाते. मात्र, शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी उभे असलेले हे भवन मोठ्या संघर्षातून उभे राहिले असून, त्याला पूर्वी मोठा विरोध झाला होता. जनआंदोलनाच्या माध्यमातूनच ही वास्तू साकार झाली असल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे.

या भवनात सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून विविध प्रबोधनपर उपक्रम राबविले जातात. अंधश्रद्धा निर्मूलन, संविधान जनजागृती तसेच सामाजिक परिवर्तनाशी संबंधित कार्यक्रम सातत्याने येथे घेतले जातात. त्यामुळे या ठिकाणी इतर कोणतेही कार्यालय सुरू करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते व विविध संघटनांनी एकमुखाने ही भूमिका मांडली असून, प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर निवेदनाची प्रत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण तसेच पोलीस अधीक्षक यांनाही देण्यात आली आहे.याप्रसंगी प्रशांत वासनिक,डी जी वानखेडे,पी व्ही बनसोडे,जी एम भोले,तानाजी शिनगारे,आर डी गायकवाड,अर्जुन जवंजाळ,गणेश खेमाडे,भास्कर जाधव,कैलास आव्हाड,राजाभाऊ झाडे, मुकुंद धूताडमल,सुनील पाटोळे,भास्कर सोनवणे,भीमराव घोडेराव, एम एम शेख पत्रकार वैभव स्वामी यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# कर्मयोगी प्रशिक्षण कार्यक्रम हा व्यापक प्रशिक्षणाचे व्यासपीठच आहे - जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी

बीड ।प्रतिनिधी

केंद्र सरकारने जनतेला दर्जेदार व वेगवान सेवा पुरवता यावी, यासाठी देशातील सर्व कर्मचाऱ्यांना व्यावसायिक दृष्ट्या अत्याधुनिक ज्ञान मिशन कर्मयोगी च्या माध्यमातून ऑनलाईन प्रशिक्षण देऊन सक्षम बनविण्यासाठी तयार केलेले कर्मयोगी एकात्मिक प्रशिक्षण कार्यक्रम हा सर्व क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी व्यापक शिक्षण व प्रशिक्षणाचे व्यासपीठच आहे, असे प्रतिपादन प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीडचे जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी पदाधिकाऱ्याच्या बैठकीत केले.



प्रहारच्या जिल्हा पदाधिकारी यांच्या नुकत्याच संपन्न झालेल्या बैठकीत शासनाच्या विविध उपयुक्त योजनांना शिक्षकांनी सकारात्मक प्रतिसाद देणे महत्त्वाचे असून ,आपला विभाग नवनवे कौशल्य, ज्ञान, विचार प्रवाह आत्मसात करत बळकट करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जिल्हा कार्याध्यक्ष ओमप्रकाश आणेराव व प्रहार एज्युकेशन सेलचे प्रमुख अण्णासाहेब खंडागळे यांनी केले.

या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट्ये आणि वैशिष्ट्ये म्हणजे सर्व प्रकारच्या सरकारी कर्मचाऱ्यांना व्यापक शिक्षण व प्रशिक्षण एकात्मिक ऑनलाइन प्रशिक्षण प्रदान करत आहे, असे जिल्हा महिला कार्याध्यक्ष श्रीमती अर्चना नाथ यांनी सांगितले.कर्मचाऱ्यांमध्ये कौशल्य विकास व्हावा म्हणून सर्जनशीलता, कल्पकता, व्यावसायिकता आणि पारदर्शकता वाढवणे हे ध्येय समोर ठेवून सदरील प्रशिक्षणासाठी हा डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिलेला आहे. सदरील योजना जागतिक दर्जाचे अभ्यासक्रम उपलब्ध करून व्यावसायिक वाढीस प्रोत्साहन देत आहे, अशी माहिती आदर्श शिक्षिका तथा जिल्हा उपाध्यक्ष श्रीमती वैशाली आकुसकर यांनी सांगितले.

# युवा नेते जयदत्त धस यांच्या टेंभुर्णी येथे सांत्वनपर भेटी

मानूर ।प्रतिनिधी

आष्टी मतदारसंघाचे युवा नेते जयदत्त धस यांनी शिरूर कासार तालुक्यातील टेंभुर्णी येथे सोमवारी सांत्वनपर भेटी देवून कुटुंबीयांना धीर देण्याचे काम केले आहे.सरपंच मिथुन डोंगरे यांनी अवकाळी आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या शेतमालासह जनावरे दगावली असल्याची माहिती माजी मंत्री तथा आमदार सुरेश धस यांच्या कानावर घातली होती.त्यानंतर युवा नेते जयदत्त धस यांनी विज पडून विजेचा धक्का लागल्याने यशोदा अमोल शिरसाट यांचा दुर्दैवी मृत्यू झालेल्या शिरसाट कुटुंबीयांना भेट देवून आधार दिला.तसेच रुस्तुम रामभाऊ शिरसाट यांच्या बैलावर विज पडल्यामुळे तो दगावला होता.त्या शेतकऱ्याची देखील जयदत्त धस यांनी सांत्वनपर भेट घेऊन आस्थेवाईकपणे



चौकशी केली.यावेळी सरपंच मिथुन डोंगरे यांच्या समवेत गौतम पारखे,महावितरणचे शाखा अभियंता शेळके साहेब,लाईनमन रोडे साहेब,जाधव साहेब,तलाठी आदींसह ग्रामस्थ भिमदादा,पांडूरंग शिरसाट,सर्जेराव शिरसाट,बाळू शिरसाट,शहादेव शिरसाट,शिवनाथ भाऊ,गणेश शिरसाट यांची उपस्थिती होती.या वेळी युवा नेते जयदत्त धस यांनी कार्यकारी अभियंता,तहसिलदार, सहपोलीस निरीक्षक यांना भ्रमणध्वनी द्वारे सुचना करून जास्तीची आर्थिक मदत कशी मिळेल या दृष्टीने प्रयत्न करण्याचे सांगितले.तसेच ग्रामस्थांनी देखील सरपंच मिथुन डोंगरे आमच्या सुखदुःखात खंबीरपणे उभे राहून सहकार्य करत असल्याची भावना व्यक्त केली.शेवटी जाताना युवा नेते जयदत्त धस यांनी मिथुन डोंगरे यांच्या कामाचे कौतुक केले.

## अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे व लोकसभा विरोधी पक्षनेते

# राहुल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस पक्ष बळकट करण्याचे उदिष्ट राहुल भैय्या जाधव

पाटोदा -

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे व लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस पक्ष बळकट करण्याच्या उदिष्टानेसंघटन सृजन अभियान राबविण्यात येत आहे.

याच पार्श्वभूमीवर आज दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १ वाजता पाटोदा तालुका काँग्रेस कमिटीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक पाटोदा येथे पार पडली.या बैठकीनंतर पक्षाच्या संघटनात्मक मजबुतीसाठी व कार्यकर्त्यांचे विचार जाणून घेण्यासाठी दिल्लीहून आलेल्या नीतू वर्मा मॅडम यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. सदर कार्यक्रम मा. एम. एम. शेख (माजी आमदार), मा. सुरेंद्र गोडजकर (संघटन निरीक्षक) तसेच श्रीमती विद्याताई पाटील (प्रदेश समन्वयक) यांच्या उपस्थितीत यशस्वीरीत्या संपन्न झाला.

बैठकीदरम्यान तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्ष बळकटीकरणासाठी आपले मार्गदर्शक विचार मांडले. तसेच काँग्रेस पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्य जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.




यावेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण भैय्या शेप, बाळासाहेब ठोंबरे, काँग्रेस तालुकाध्यक्ष राहुल जाधव, कृषी बाजार समिती संचालक शिवाजीराव कोकाटे, आनंदराव कोकाटे, युवक काँग्रेस अध्यक्ष सुनील काळे, सरचिटणीस विशाल मस्के, बीड तालुका अध्यक्ष गणेश बिजगुडे, शेख इल्यास, लक्ष्मण भाकरे, मारुतीराव पवळ, माणिक जाधव, अशोक येवले आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# घुंगर्डे हादगाव येथे शेतकऱ्यांचा एल्गार; ८ एप्रिलपासून बेमुदत उपोषण




घुंगर्डे हादगाव (प्रतिनिधी)

रुई - घुंगर्डे हादगाव पांदण रस्त्याच्या प्रलंबित प्रश्नावरून शेतकऱ्यांनी आता आक्रमक भूमिका घेतली असून, दि. ८ एप्रिलपासून बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.

या पार्श्वभूमीवर काल रात्री शेतकऱ्यांनी गावातील मुख्य चौक, प्रमुख रस्ते व सार्वजनिक ठिकाणी उपोषणासंदर्भातील बॅनर लावून आंदोलनाची जोरदार तयारी सुरू केल्याचे चित्र दिसून आले. गावात ठिकठिकाणी लावलेल्या बॅनरमुळे नागरिकांचे लक्ष वेधले गेले असून, आंदोलनाची चर्चा सर्वत्र सुरू झाली आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून संबंधित पांदण रस्त्यासाठी शेतकरी तहसील कार्यालय, उपविभागीय कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वारंवार पाठपुरावा करत आहेत. प्रशासनाकडून केवळ आश्वासने मिळत असून प्रत्यक्षात कामाला सुरुवात होत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.या अन्यायाविरोधात शेतकऱ्यांनी एकत्र येत उपोषणाचा मार्ग स्वीकारला असून, रस्ता झालाच पाहिजे या ठाम भूमिकेतून आंदोलन छेडण्यात येणार आहे.या उपोषणात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी होणार असल्याचे सांगण्यात येत असून, प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन रस्त्याचे काम सुरू करावे, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

# अपील मान्य तरीही रुजू नाही प्रशासनावर गंभीर प्रश्नचिन्ह

## राजकीय द्वेषातून कारवाई ? रोजगार सहाय्यकाच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ

हिंगोली ।प्रतिनिधी

हिंगोली तालुक्यातील लिंबाळा मक्ता येथील रोजगार सहाय्यक प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले असून प्रशासनाच्या भूमिकेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेख फैसल शेख लतीफ यांना ग्रामपंचायतीकडून कथित राजकीय द्वेषातून सेवेतून कमी करण्यात आल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे गटविकास अधिकाऱ्यांनी त्यांच्या बाजूने निर्णय दिल्यानंतरही त्यांना पुन्हा सेवेत रुजू करून घेतले जात नसल्याने संताप वाढला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित रोजगार सहाय्यकाने आपल्यावर झालेल्या अन्यायाविरोधात गटविकास अधिकाऱ्यांकडे अपील दाखल केले होते. या अपीलवर सखोल चौकशी करत अधिकाऱ्यांनी सर्व आरोप फेटाळून लावत संबंधित कर्मचाऱ्याला दिलासा दिला. मात्र हा निर्णय कागदावरच राहिला असून प्रत्यक्षात ग्रामपंचायत प्रशासनाने त्याची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केल्याचे दिसून येत आहे.यामुळे अन्यायग्रस्त कर्मचाऱ्याने उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांच्याकडे दुसरे अपील दाखल केले आहे.



मात्र, या अपीलवरही अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह अधिकच गडद झाले आहे.

दरम्यान गेल्या १० ते १२ वर्षांपासून प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या शेख फैसल यांच्या कामाची गावातील अनेक लाभार्थ्यांनी पत्राद्वारे प्रशंसा केली असल्याचेही समोर आले आहे. तरीही त्यांच्यावर कारवाई होणे आणि न्याय मिळण्यात होत असलेला विलंब यामुळे हे सर्व राजकीय सूडबुद्धीतूनच घडत आहे का ? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

या संपूर्ण प्रकरणाचा सर्वाधिक फटका मात्र संबंधित कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला बसत आहे. उत्पन्नाचे साधन बंद झाल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. न्याय मिळत नसल्याने त्यांनी टोकाची भूमिका घेण्याचे संकेत दिल्याने परिस्थिती आणखी गंभीर बनण्याची शक्यता आहे.

अपील मान्य असताना देखील न्याय न मिळणे म्हणजे प्रशासनाचा निष्क्रियपणा की राजकीय दबाव ? असा संतप्त सवाल आता जनतेतून उपस्थित होत आहे.आता या प्रकरणात प्रशासन खरोखरच न्यायाची बाजू घेणार की राजकीय हस्तक्षेपाला शरण जाणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. जिल्हाभरात या घटनेची जोरदार चर्चा सुरू असून संबंधित रोजगार सहाय्यकाला तातडीने न्याय मिळावा अशी मागणी जोर धरत आहे.

# आष्टीत भाजपाचा स्थापना दिन उत्साहात ;छत्रपती संकुलात ध्वजारोहण

## घराघरात माझा परिवार,भाजपा परिवार अभियान

आष्टी - (प्रतिनिधी) भारतीय जनता पक्षाच्या ४६ व्या स्थापना दिनानिमित्त आष्टी तालुक्यात उत्साहपूर्ण वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. माझा परिवार, भाजपा परिवार या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक कार्यकर्ता, पदाधिकारी आणि समर्थकाने आपल्या घरावर भाजपाचा ध्वज फडकावून स्थापना दिन साजरा केला. सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ रोजी छत्रपती संकुलातील मध्यवर्ती भाजपा कार्यालयावरही विधिवत ध्वजारोहण करण्यात आले.

या कार्यक्रमास आष्टी मंडल अध्यक्ष रमेश भाऊ गावडे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण तालुक्यात घराघरावर भगवा ध्वज फडकताना दिसत होता, त्यामुळे वातावरणात पक्षाभिमान आणि उत्साहाचे रंग भरले होते.

यावेळी मराठवाडा भूषण, लोकनेते आमदार सुरेश अण्णा धस यांनी सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी आणि सदस्यांना स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनी स्वतःच्या अद्वैतचंद्र निवासस्थानी भाजपाचा ध्वज फडकावून पक्षाविषयी असलेला अभिमान आणि जनसेवेचे समाधान व्यक्त केले. भाजपा नाव समृद्धीचे, भाजपा नाव विश्वासाचे या भावनेतून विकसित भारत घडविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमादरम्यान पक्षाच्या भगव्या ध्वजाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. हा ध्वज केवळ पक्षाचे प्रतीक नसून राष्ट्रहित, देशभक्ती, सेवा आणि समर्पण या मूल्यांचे प्रतिनिधित्व करतो, असे सांगण्यात आले. स्थापनेपासून आजपर्यंत कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमामुळेच भाजपा देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे, ही भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.'माझा परिवार, भाजपा परिवार' ही संकल्पना केवळ घोषवाक्य नसून ती पक्षाच्या तळागाळातील कार्यपद्धतीचे प्रतीक आहे. या माध्यमातून प्रत्येक कुटुंबाशी संवाद साधून त्यांना पक्षाच्या विचारधारेशी जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. घराघरात ध्वज फडकवल्याने



कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होत असून समाजात सकारात्मक संदेश पोहोचत आहे.स्थापना दिनानिमित्त राज्यभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून आष्टी तालुक्यातही त्याला मोठा प्रतिसाद मिळाला. स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे, गरजूंसाठी मदतकार्य तसेच शासकीय योजनांची माहिती देणारे जनजागृती कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात आले. कार्यकर्त्यांनी बूथस्तरावर जाऊन नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला.

याशिवाय सोशल मीडियावरही या अभियानाला मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी देण्यात आली. कार्यकर्त्यांनी आपल्या घरावर ध्वज फडकावतानाचे फोटो व व्हिडिओ शेअर करून सक्रिय सहभाग नोंदवला. भाजपाच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने पक्षाची विचारसरणी अधिक व्यापक करण्यासोबतच संघटन बळकट करण्यावर भर देण्यात आला. आष्टी तालुक्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवत हा दिवस प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरविला.

# सय्यद हसन साहब व हनुमान जयंती यात्रेनिमित्त भव्य आयोजन



धामणगाव येथे जंगी कुस्ती हगामाचा थरार

आष्टी (प्रतिनिधी) मौजे धामणगाव (ता. आष्टी) येथे सय्यद हसन साहब यात्रा व हनुमान जयंती यात्रेच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक जंगी कुस्ती हगामाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या कुस्ती स्पर्धेला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून रंगलेल्या लढतींनी उपस्थितांची उत्सुकता शिगेला पोहोचवली. या भव्य कुस्ती स्पर्धेचा शुभारंभ शिक्षणमहर्षी तथा माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते करण्यात आला. आपल्या मनोगतात त्यांनी ग्रामीण भागातील पारंपरिक क्रीडा संस्कृती जपण्याचे महत्त्व अधोरेखित करत कुस्ती हा महाराष्ट्राच्या मातीचा अभिमान असल्याचे सांगितले. अशा स्पर्धांमुळे युवकांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त व जिद्द निर्माण होते, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाला उद्योजक बापुसाहेब डोके, जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे, माजी जि.प. सदस्य महारनोर, संजयजी गाढवे, माजी पंचायत समिती सदस्य अमोल चौधरी, सुदाम काका झिंजुर्के, रमेश नरवडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली.

या कुस्ती हगाम्यात तालुका तसेच परिसरातील नामांकित मल्लांनी सहभाग घेतला होता. विविध गटांमध्ये झालेल्या कुस्त्यांमध्ये जोरदार चुरस पाहायला मिळाली. काही लढती तर इतक्या रोमांचक झाल्या की प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात मल्लांना उत्साह दिला. विजेत्या मल्लांना रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यात्रेनिमित्त गावात धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. सय्यद हसन साहब यांच्या यात्रेला भाविकांची मोठी गर्दी उसळली होती, तर हनुमान जयंतीनिमित्त मिरवणुका, भजन-कीर्तन आणि विविध उपक्रमांनी वातावरण भक्तिमय झाले होते. या सर्व उपक्रमांमुळे गावात उत्सवाचे आनंदमय वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाचे नियोजन ग्रामस्थ व तरुण मंडळाच्या वतीने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. कुस्ती मैदानाची उत्कृष्ट व्यवस्था, पाहुण्यांचे स्वागत, तसेच सुरक्षेची योग्य खबरदारी घेतल्यामुळे कार्यक्रम सुरळीत पार पडला. एकूणच, धामणगाव येथे पार पडलेला हा जंगी कुस्ती हगामा आणि यात्रा उत्सव हा ग्रामीण संस्कृतीचा जिवंत वारसा जपणारा ठरला असून, अशा उपक्रमांमुळे समाजात एकोपा व परंपरेबद्दल अभिमान निर्माण होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती महोत्सवाच्या अध्यक्षपदी ललेश पाटील आणि कोषाध्यक्षपदी दत्तात्रय पाटील कावडे यांची सर्वानुमते निवड

धर्माबाद / प्रतिनिधी

१२ व्या शतकात समता न्याय बंधुतेची शिकवण देणाऱ्या क्रांतीसुर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांच्या ९२१ व्या जयंती महोत्सवाच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते ललेश पाटील संगावार व दत्तात्रय पाटील कावडे अध्यक्ष व कोषाध्यक्ष पदी सर्वानुमते निवड करण्यात आली तर सचिव म्हणून संतोष पाटील आटकळे यांची निवड करण्यात आली.

यावेळी महात्मा बसवेश्वर अनुभव मंटप बसवन्ना हिल्स धर्माबाद येथे आयोजित केलेल्या समाज बांधवांच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी शंकर पाटील होट्टे, प्रकाश पाटील जायशेठ ,सोनू महाबळेश्वर पाटील बंन्नाळीकर यांची उपस्थिती होती.



१९ एप्रिल रविवारी अक्षय तृतीयादिनी प्रतिवर्षीप्रमाणे जगत ज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांचा जयंती महोत्सव मोठ्या हर्षोउल्लासामध्ये धर्माबाद नगरीमध्ये सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्यात येतो. याही वर्षी भव्य मोटरसायकल रॅली विविध सामाजिक उपक्रमाने महात्मा बसवेश्वरांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्याचा संकल्प महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती महोत्सव समिती मोठा स्वरूपात साजरा करण्यात येतो. याही वर्षी भव्य मोटरसायकल रॅली विविध सामाजिक उपक्रमाने महात्मा बसवेश्वरांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्याचा संकल्प महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती महोत्सव बसवन्ना हिल्स यांचा असून सर्व समाज बांधवांनी या जयंती महोत्सवांमध्ये सहभाग घ्यावा असे आवाहनही जयंती मंडळाचे नूतन अध्यक्ष व कोषाध्यक्ष ललेश पाटील संगावार आणि दतात्रय पाटील कावडे यांनी केले आहे.यावेळी धर्माबाद तालुक्यातील वीरशैव लिंगायत समाज बांधवांची उपस्थिती होती.

# जालना महसूल सेवक संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी सर्वानुमते संदीप धारे यांच्यासह नवी कार्यकारणी जाहीर

जालना ।प्रतिनिधी

जालना जिल्हा महसूल सेवक संघटनेच्या जिल्हा कार्यकारणीची नव्याने नियुक्ती करण्यात आली असून संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी संदीप धारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे संघटनेला सक्षम आणि गतिमान नेतृत्व मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

या नव्या कार्यकारणीत जिल्हा उपाध्यक्षपदी अण्णासाहेब ढोबळे तर सचिवपदी तुकाराम सवळे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच संघटनेचे मार्गदर्शक म्हणून दादासाहेब आठवले यांची नियुक्ती करण्यात आली असून



कार्याध्यक्षपदी योगेश कान्हेरे यांची निवड करण्यात आली आहे.

नवीन कार्यकारणीमध्ये अनुभवी आणि कार्यक्षम पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आल्याने संघटनेच्या कामकाजाला नवी दिशा आणि गती मिळेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे. महसूल विभागातील कर्मचारी व त्यांच्या समस्या प्रभावीपणे मांडून न्याय मिळवून देण्यासाठी ही टीम सक्षमपणे कार्य करेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.दरम्यान नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# समुद्रात वाहून जाणारे पाणी दुष्काळी भागाकडे वळवा

## आष्टी, पाटोदा व शिरूर का.साठी २० टीएमसी पाण्याची मागणी



**राष्ट्रवादीचे नेते माजी आ.भीमराव धोंडे यांचे जलसंपदा मुख्य अभियंत्यांना साकडे ; ३०० गावांचा पाणीप्रश्न सुटण्याची आशा**

पाटोदा (प्रतिनिधी)

मराठवाड्यातील अत्यंत अवर्षणप्रवण आणि कायम दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या आष्टी,पाटोदा व शिरूर का. या तालुक्यांसाठी एक महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक बातमी आहे. समुद्रात वाहून जाणारे पाणी या दुष्काळी पट्ट्याकडे वळवून या भागाला १५ ते २० टीएमसी पाणी उपलब्ध करून द्यावे अशी आग्रही मागणी आष्टी विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते माजी आ. भीमराव धोंडे यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता श्री. नाईक यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना मागण्यांचे सविस्तर पत्र दिले.आष्टी,पाटोदा, शिरूर का. हे तिन्ही तालुके वर्षानुवर्षे पाण्याच्या तीव्र टंचाईचा सामना करत आहेत.या भागात दरवर्षी निर्माण होणाऱ्या दुष्काळी परिस्थितीमुळे नागरिकांना केवळ पिण्याच्या पाण्यासाठीच नव्हे, तर शेतीसाठीही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.या भीषण परिस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासनाने कोकणातून समुद्रात वाहून जाणारे अतिरिक्त पाणी अडवून ते या अवर्षणप्रवण भागाकडे वळवावे, अशी संकल्पना व मागणी आ.भीमराव धोंडे यांनी शासनाकडे मांडली आहे.शासनाने या योजनेला मंजुरी दिल्यास आणि १५ ते २० टीएमसी पाणी या दुष्काळी पट्ट्यासाठी उपलब्ध करून दिल्यास,या तीनही तालुक्यातील सुमारे ३०० गावांचा पाणी पुरवठ्याचा प्रश्न कायमचा मार्गी लागू शकतो.यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तर सुटेलच, शिवाय सिंचनाची सोय झाल्यामुळे इथल्या शेतकऱ्यांना व सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.

पाण्याचा हा जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी जलसंपदा विभागाच्या मुख्य अभियंत्यांना निवेदन देतेवेळी माजी आ.भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, रिपाईचे तालुकाध्यक्ष

अशोक साळवे, हरिभाऊ जंजिरे, उत्तम बोडखे, पांडुरंग गावडे, सतीश झगडे आदी पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.शासनाने या प्रस्तावाचा तातडीने व सकारात्मक विचार करून या अवर्षणग्रस्त भागाला न्याय द्यावा अशी अपेक्षा या शिष्टमंडळाने व्यक्त केली आहे. प्रशासनाने यावर लवकरच योग्य ती पावले उचलल्यास या भागाचे नंदनवन होण्यास वेळ लागणार नाही.

# शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न? महसूलमंत्र्यांच्या मालमत्तेची पोलखोल केल्याने पत्रकारावर गुन्हा दाखल!

परतूर ।प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून सध्या राजकारण तापले असतानाच, आता पत्रकार आणि शासन यांच्यातील संघर्ष तीव्र झाला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मालमत्तेबाबत पुराव्यानिशी व्हिडिओ प्रसिद्ध करणारे 'दैनिक बुलंद शक्ती'चे संपादक आणि निर्भीड पत्रकार रामेश्वर शिवाजी दरेकर यांच्यावर चिकलठाणा एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे पत्रकार वर्तुळात आणि शेतकरी संघटनांमध्ये संतापाची लाट उसळली असून, ही 'लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची गळचेपी' असल्याची टीका होत आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ज्या शेतकऱ्यांकडे गाडी आणि बंगला आहे, त्यांना कर्जमाफी मिळणार नाही, असे विधान केले होते. या विधानाचा समाचार घेत रामेश्वर दरेकर यांनी फेसबुकच्या माध्यमातून एक व्हिडिओ प्रसिद्ध केला. यात त्यांनी मंत्र्यांच्या स्वतःच्या महागड्या गाड्या (इचथ) आणि स्थावर मालमत्तेचा पुराव्यानिशी पर्दाफाश केला होता. मंत्र्यांना गाडी-बंगला चालतो, मग शेतकऱ्याने काय आयुष्यभर झोपडीतच राहायचे का? असा परखड सवाल दरेकर यांनी उपस्थित केला होता.

या व्हिडिओनंतर संतापलेल्या राजकीय दबावातून पांडुरंग विठ्ठलराव डक मांडकीकर यांच्या फिर्यादीवरून दरेकर यांच्यावर भारतीय नागरिक



सुरक्षा संहिता कलम ३५२, ३५३(२), ३५६(२) आणि ६७ अन्वये गुन्हा (क्र. १६७/२०२६) दाखल करण्यात आला आहे या प्रकरणात पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. पोलीस उपायुक्त (परिमंडळ २) आणि पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव यांनी मंत्र्यांच्या दबावाखाली येऊन ही कारवाई केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, दरेकर यांनी यापूर्वी बेगमपुरा पोलीस ठाण्याचे निरीक्षक मंगेश जगताप यांचा १४ लाखांच्या लाचेचा व्हिडिओ समोर आणला होता, तसेच पुंडलिक नगरच्या लाचखोर निरीक्षकाला एसीबीच्या जाळ्यात पकडून दिले होते. याच रागातून पोलीस आयुक्त आणि महसूलमंत्री संगनमताने दरेकर यांना अडकवत असल्याची चर्चा आहे. तसेच निवेदनद्वारे पत्रकारांना प्रमुख मागण्या आहे की

मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात खालील मागण्या करण्यात आल्या आहेत:१. पत्रकार रामेश्वर दरेकर यांच्यावरील खोटा गुन्हा तात्काळ रद्द करण्यात यावा.२. पत्रकाराला दबावतंत्राचा वापर केल्याप्रकरणी पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि फिर्यादी पांडुरंग डक यांच्यावर गुन्हा दाखल करावा. ३. शेतकऱ्यांची थट्टा करणाऱ्या महसूलमंत्र्यांचा राजीनामा घेऊन त्यांच्यामालमत्तेची चौकशी करावी.४. रामेश्वर दरेकर यांच्या जीविताला धोका असल्याने त्यांना तातडीने पोलीस संरक्षण मिळावे. तसेच सत्य परिस्थिती मांडणाऱ्या पत्रकाराचा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाल्यास संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी रस्त्यावर उतरतील, असा इशारा शेतकरी समर्थकांनी दिला आहे. जर हा गुन्हा रद्द झाला नाही, तर राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.लोकशाहीत प्रश्न विचारणाऱ्या पत्रकाराला जेल की न्याय? आता सर्वांचे लक्ष गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयाकडे लागले आहे.

# कासारीत संत शिवस्वरूप बन महाराजांच्या हरिनाम सप्ताहाला उद्यापासून प्रारंभ

## पहिल्या दिवशी ह.भ.प. शिवाजी महाराज जगताप यांचे कीर्तन

आष्टी - (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र कासारी येथे संत शिवस्वरूप बन महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त बुधवार दि. ८ एप्रिलपासून अखंड हरिनाम सप्ताहाला भक्तिमय वातावरणात प्रारंभ होत आहे. या सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी रात्री ह.भ.प. शिवाजी महाराज जगताप यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले असून, भाविकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. दि. ८ ते १५ एप्रिल या कालावधीत होणाऱ्या या सप्ताहामध्ये शिव महापुराण कथा, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा तसेच अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज दुपारी २ ते सायंकाळी ५ या वेळेत ह.भ.प. आदिनाथ महाराज गिरी (गोंदीकर) यांची सुश्राव्य शिव महापुराण कथा होणार असून, भक्तांना आध्यात्मिक मार्गदर्शनाचा लाभ मिळणार आहे.

या सप्ताहात ह.भ.प. शिवाजी महाराज जगताप, ह.भ.प. अमित महाराज धाडगे, ह.भ.प. भागवत महाराज बादाडे, ह.भ.प. अक्षय महाराज पिंगळे, ह.भ.प. शंतनू महाराज गिरी, ह.भ.प. महादेव महाराज गिरी तसेच ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कोठुळे यांची हरिकीर्तने होणार आहेत. कीर्तनांना मृदंगाचार्य योगेश महाराज क्षीरसागर (पांचाळ) व परशुराम महाराज डोंगरे यांची साथ लाभणार आहे. तसेच गायनाचार्य शुभम महाराज घेवरे, भागवत महाराज नरवडे, दत्ता खाडे, रविंद्र तवले, भाऊसाहेब जाधव, किशोर भोराडे, अशोक काकडे, भोसले महाराज, नाना भोगाडे यांच्यासह पंचक्रोशीतील गायक मंडळींचा सहभाग राहणार आहे.

रविवार दि. १२ एप्रिल रोजी रात्री ११ ते १ या वेळेत प्रसिद्ध भारुडकार ह.भ.प. विष्णू महाराज बांडे (गेवराई) यांचा भारुडाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, जो भाविकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. बुधवार दि. १५ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. लक्ष्मण महाराज पाटील (आळंदी) यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने ह.भ.प. श्रीहरी पुरी महाराज, ह.भ.प. आदिनाथ महाराज दानवें, ह.भ.प. संतोष महाराज मोरे व सुदर्शन मुनी महाराज यांच्या हस्ते कलश पूजन होणार आहे. तसेच ह.भ.प. ब्रह्मचैतन्य महाराज तावरे, ह.भ.प. परसराम महाराज बन व ह.भ.प. ज्ञानदेव महाराज जगताप हे व्यासपीठ चालक म्हणून कार्य पाहणार आहेत.

दि. १४ एप्रिल रोजी दिंडी प्रदक्षिणा व पादुका मिरवणूक काढण्यात येणार असून, परिसर भक्तिमय होणार आहे. विशेष म्हणजे पैठण येथून पवित्र गंगाजल आणण्याची परंपरा जपली जात असून, सुमारे ५० मुले अनवाणी पायी जाऊन गंगाजल घेऊन येतात. या गंगाजलाने संतांच्या समाधीवर अभिषेक केला जाणार आहे, ही या सोहळ्याची वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. काल्याच्या कीर्तन प्रसंगी आ. सुरेश धस, माजी आ. बाळासाहेब आजबे, माजी आ. भीमराव धोंडे, माजी आ. साहेबराव दरेकर, देविदास आबा धस, सतीश आबा शिंदे, सरपंच सौ. शालन अशोक मुळे, उपसरपंच डॉ. जालिंदर वांढरे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या भव्य धार्मिक सोहळ्यास परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन संत शिवस्वरूप बन महाराज सप्ताह समिती, तरुण मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



# गुणवत्ता व नीतिमत्ता हेच यशाचे खरे साथीदार - उद्योजक भरत गीते

## महाराष्ट्र उद्योगभूषण पुरस्काराने सन्मान व प्रकट मुलाखत

पुणे ।प्रतिनिधी

ज्या भारतभूमीने आपल्याला घडवले, त्या भारताला आत्मनिर्भर बनविण्यात आपण योगदान द्यायला हवे, या भावनेतून जर्मनीहून भारतात परतलो आणि उद्योग सुरु केला. भारतीय बनावटीचे उत्पादन करून भारत आत्मनिर्भर होण्यात, तसेच युवापिढीला चांगले शिक्षण मिळावे, यासाठी शिक्षण क्षेत्रात योगदान देण्यासाठी माझा प्रयत्न आहे, गुणवत्ता आणि नीतिमत्ता हेच माझ्या यशाचे खरे साथीदार असल्याचे प्रतिपादन ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया', तौराल इंडियाचे संस्थापक भरत गीते यांनी केले.

रमामंगल सोशल फाउंडेशन आणि एक्सप्रेस मीडिया एंटरप्रायझेस यांच्या संयुक्त विद्यमाने भरत गीते यांना 'फेस ऑफ इन्स्पिरेशन' महाराष्ट्र उद्योगभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच यावेळी प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी गीते यांची प्रकट मुलाखत घेत त्यांचा परळी ते जर्मनी व्हाया पुणे आणि उद्योगाची यशोगाथा उलगडली. चिंचवड येथील रामकृष्ण मोरे सभागृहात आयोजित सोहळ्यावेळी खासदार श्रीरंग बारणे, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, शिवसेना नेत्या सुलभा उबाळे, महावितरणचे अधिकारी धनंजय औंढेकर, शिवसेनेचे सचिव वैभव थोरात, उद्योजक अमेय जैन, संयोजक




मनिषा थोरात पिसाळ व संतोष सौंदणकर आदी उपस्थित होते.भरत गीते यांनी आपल्या जीवनप्रवासातील संघर्ष आणि यशाची कहाणी मोकळेपणाने मांडली. ते म्हणाले की, या प्रवासामध्ये माझी पत्नी प्राची हिचा सिंहाचा वाटा आहे. जर्मनीसारख्या प्रगत देशातील स्थिर आयुष्य सोडून भारतात उद्योग उभारण्याचा निर्णय घेताना, तसेच सुरुवातीच्या अत्यंत खडतर काळात तिने खंबीरपणे साथ दिली. अत्यंत साध्या शेतकरी कुटुंबात वाढलो. वडिलांनी, मोठ्या भावांनी शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांचा संघर्ष मला प्रेरक ठरला. त्यातूनच जिद्द, चिकाटी आणि मेहनतीचे महत्त्व उमगत गेले.

जर्मनीहून पोहोचल्यानंतर अल्युमिनियम क्षेत्रात संधी असल्याचे हेरून त्यात काम सुरु केले. अल्युमिनियम हलके, गंजरोधक आणि टिकाऊ असूनही, तंत्रज्ञानाची कमतरता भारतात त्याचा योग्य प्रमाणात आणि आधुनिक पद्धतीने वापर होत नाही. यामध्ये नवे तंत्रज्ञान विकसित करून भारताला आत्मनिर्भरतेकडे नेण्याचा प्रयत्न सुरु आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या बैठकीत तीन महत्त्वाचे मुद्दे मांडले. त्यापैकी 'उद्योगांचे विकेंद्रीकरण' हा महत्त्वाचा मुद्दा होता. उद्योग केवळ काही शहरांपुरते मर्यादित न राहता ग्रामीण आणि दुर्गम भागातही पोहोचले पाहिजेत, असे त्यांनी ठामपणे सांगितले.देवेंद्र फडणवीस हे विकासाभिमुख नेतृत्व असून, राज्यातील औद्योगिक विकासासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे उद्योगांना चालना मिळत आहे. त्यांच्या नेतृत्वात धोरणात्मक काम करण्याची इच्छा असून, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात उद्योग नेण्यासाठी त्यांचे पाठबळ महत्वपूर्ण ठरत आहे. येत्या काळात उद्योग आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रात भरीव काम करून विकासात योगदान देण्यासाठी कटिबद्ध आहे. कोणत्याही उद्योगात गुणवत्ता आणि नीतिमत्ता या दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात. दीर्घकालीन यश मिळवण्यासाठी केवळ नफा नव्हे, तर प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि उत्कृष्टतेला प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी नमूद केले.

श्रीरंग बारणे म्हणाले, शहराच्या जडणघडणीत विविध भागांतून आलेल्या लोकांचे मोठे योगदान आहे. विशेतः मराठवाडा, विदर्भातील लोकांचा यामध्ये सहभाग आहे. प्रत्येकाने आपल्या कर्तृत्वाने आणि मेहनतीने पुण्याच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलला आहे. नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांचे कार्य उल्लेखनीय आहे. नाम फाउंडेशनच्या माध्यमातून मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या पाणी समस्येवर प्रभावीपणे काम केले आहे. दुष्काळग्रस्त भागांमध्ये पाणी उपलब्ध करून देणे, जलसंधारण प्रकल्प राबवणे आणि शेतकऱ्यांना आधार देणे अशा विविध उपक्रमांद्वारे त्यांनी समाजात मोठा बदल घडवून आणला आहे.रवी लांडगे यांनीही मनोगत व्यक्त केले. आपण समाजाला देणे लागतो, या भावनेतून उभारलेले कार्य समाजाच्या हिताचे असते. औद्योगिकनगरी पिंपरी-चिंचवडमध्ये जागतिक दर्जाचे ग्रंथालय, शिक्षण व साहित्य उपलब्ध करण्यासाठी पुढाकार घेतला, असून या उपक्रमात उद्योजकांनीही साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. मनीषा थोरात पिसाळ यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. शुभांगी शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष सौंदणकर यांनी आभार मानले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य जाणाऱ्या व्यक्तींना 'फेस ऑफ इन्स्पिरेशन' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे हे ११ वे वर्ष होते.

# स्वत:ला ओबीसी नेते म्हणवून घेणारे लोकप्रतिनिधी जातनिहाय जनगणनेवर गप्प का - अर्जुन दळे

बीड/प्रतिनिधी

केंद्र सरकारकडून ओबीसी जातनिहाय जनगणनेच्या आश्वासनाचे पालन होताना दिसत नाही. ओबीसींच्या जातीसाठी जनगणनेत स्वतंत्र रकाना (कॉलम) नाही. या पार्श्वभूमीवर सर्व ओबीसी मंत्री, खासदार आणि आमदारांनी केंद्र सरकारला जाब विचारायला हवा, परंतु मराठवाड्यातील स्वत:ला ओबीसी नेते म्हणवून घेणारे राष्ट्रीय लोकप्रतिनिधी, मंत्री, खासदार, मौन बाळगून असून या प्रश्नावर कधी आवाज उठविणार असा सवाल राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुन दळे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केला आहे.



केंद्र सरकारने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच ओबीसींच्या जातनिहाय जनगणनेची घोषणा केली. २२ जानेवारी २०२६ रोजी ३३ प्रश्नांची सूची राजपत्रात प्रकाशित झाली. या यादीत घर क्रमांक, कुटुंब प्रमुखाचे नाव, लिंग, घरातील खोल्यांची संख्या, पिण्याच्या पाण्याचे स्रोत, शौचालय, वीज, इंटरनेट, टीव्ही, मोबाईलसह इतर मूलभूत माहिती विचारण्यात आली आहे. तथापि, बाराव्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि जमातींचा स्पष्ट उल्लेख असून, इतर प्रवर्गासाठी 'इतर' असा शब्द वापरण्यात आला आहे. ओबीसी समाजाचा स्पष्ट उल्लेख नाही, ज्यामुळे जनगणनेवरून प्रश्न निर्माण झाले आहेत. यावर राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्यावतीने दिल्ली येथे जंतरमंतर येथे दि.२३ मार्च २०२६ रोजी आंदोलन केले होते.

मात्र सर्व ओबीसी मंत्री, खासदार आणि आमदारांनी मौन बाळगले आहे. त्यामुळे समाज संतप्त झाला, असे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष अर्जुन दळे यांनी म्हटले आहे.

ओबीसींच्या प्रदीर्घ लढ्यानंतर सरकारला जातनिहाय जनगणनेची घोषणा करावी लागली. मात्र प्रत्यक्षात जनगणना करताना वचन विसरले गेले आहे. ही समाजासोबत केलेली दगाबाजी कदापि सहन केली जाणार नाही. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात, गावागावांत जनजागृती करून समाजाला जागरूक केले जाईल, असे ते म्हणाले. ओबीसींची जनगणना ऑक्टोबर २०२६ पासून जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये सुरू होणार असून, उर्वरित भागात मार्च २०२७ पासून होईल, असे आधी स्पष्ट करण्यात आले होते.

जनगणना आयुक्तांनी काढलेल्या राजपत्रावर लोकप्रतिनिधी गप्प का ?

केंद्र सरकारच्या ३० मे २०२५ मंत्रिमंडळ बैठकीत जातनिहाय जनगणनेचा निर्णय झाला तेव्हा निर्णयाचे स्वागत करणारे सरकार मधील आमदार, खासदार प्रत्यक्षात दिनांक २२ जानेवारी २०२६ ला जनगणना आयुक्तांनी काढलेल्या राजपत्रावर गप्प का ?

---

आवसगाव जिल्हा परिषद शाळेला आयडीबीआय बँकेकडून सीएसआर निधीतून अत्याधुनिक

# आरओ पाणी शुद्धीकरण प्रकल्प भेट,शाखा व्यवस्थापक श्री.दिपक कोल्हे व सहकारी यांच्या हस्ते वितरण

केज/प्रतिनिधी

दि.४ एप्रिल रोजी आवसगाव जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,आवसगाव येथे आयडीबीआय बँकेच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत अत्याधुनिक आर ओ पाणी शुद्धीकरण प्रकल्प प्रदान करण्यात आला. याउपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. गावातील नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले आहे.कार्यक्रम उत्साहात पार पडला.यावेळी आयडीबीआय बँकेचे बनसारोळा शाखा व्यवस्थापक दीपक कोल्हे,उप शाखा व्यवस्थापक आदित्य किसन तसेच कर्मचारी अतुल गोरे उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक कस्पटे सर यांनी दीपक कोल्हे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला,तर हंडीबाग सर यांनी आदित्य किसन



यांचा सन्मान केला.देशमुख सर यांनी सर्व बँक कर्मचाऱ्यांचा गौरव करून आभार व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन,प्रस्तावना आणि समारोप तानाजी जाधव सर यांनी प्रभावी व ओघवत्या शब्दांत सादर केला.यावेळी आवसगावचे सरपंच विश्वास शिनगारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.त्यांनी आपल्या भाषणात शाळेच्या विकासासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली व बँकेचे आभार मानले.

आपल्या मनोगतात बँक शाखा व्यवस्थापक श्री. दीपक कोल्हे यांनी शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आयडीबीआय बँक कटिबद्ध असल्याचे सांगितले.पुढील वर्षी सीएसआर निधीतून शाळेसाठी स्वच्छतागृह उभारणी तसेच विद्यार्थ्यां साठी डेस्क उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाल्यास त्यांचा शैक्षणिक दर्जा निश्चितच उंचावेल असे ते म्हणाले.

शाळेतील शिक्षकांनीही या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, आरओ प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल होईल,असा विश्वास व्यक्त केला. विशेषतः उन्हाळ्याच्या काळात स्वच्छ पाण्याची उपलब्धता ही मोठी गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक वृंद,शिक्षकेतर कर्मचारी तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्वांच्या सहकार्या मुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमामुळे शाळेच्या विकासाला चालना मिळणार असून विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि शिक्षणासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# तमाशा कलावंतांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा कला क्रीडा विश्व समिती केजच्या वतीने तीव्र निषेध

केज ।प्रतिनिधी

वाहनाला धक्का लागल्याच्या कारणावरून दुचाकीस्वार व त्यांच्या साथीदाराने राष्ट्रपती सुवर्णपदक विजेत्या दिवंगत विठाबाई नारायणगावकर यांच्या तमाशाच्या फडातील कलावंतांवर हल्ला करत मारहाण व महिला कलावंतांनाही मारहाण करून त्यांचा विनयभंग करण्यात आला.याचा निषेध कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने सोमवार रोजी निवेदन दिले आहे.बुधवारी दुपारी दोनच्या सुमारास नाशिक -पुणे महामार्गावर संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील व रुढी पठार शिवारात ही घटना घडली या प्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात रात्रीपर्यंत गुन्हा दाखल झाला नव्हता या फडाचा संगमनेर तालुक्यात पोखरी बाळेश्वर येथे दि. ३१ मार्चला तमाशाचा कार्यक्रम होता तो संपून बुधवारी हे कलावंत तालुक्यातील माळेगाव पठार येथे कार्यक्रमा साठी वाहनातून जात होते महामार्गावर व रुढी पठार येथील एका पेट्रोल पंपावर तमाशा कलावंतांची गाडी इंधन भरण्यासाठी थांबली होती.त्यानंतर पुढे महामार्गाला वाहने लागल्यानंतर एका दुचाकी स्वाराने तमाशा कलावंतांच्या




वाहनाला धक्का मारला त्यानंतर दुचाकीस्वाराने पुढे जाऊन दुचाकी आडवी लावत तमाशा कलावंतांच्या वाहनाच्या चालकाला मारहाण करण्यास सुरुवात केली त्यानंतर दहा मिनिटात त्याने तिथे ५० ते ६० जणांना बोलावून घेतले व त्या सर्वांनी मिळून संपूर्ण तमाशा कलावंतांना बेदम मारहाण केली. महिलांनाही मारहाण करत त्यांचे कपडे फाडले त्यानंतर विनयभंग केला तसेच मारहाण करणाऱ्यांनी काही रक्कम चोरून नेली अशी माहिती विठाबाई नारायणगावकर यांचे नातू मोहित नारायणगावकर यांनी माहिती दिली.या सर्व गोष्टीचा केज येथील कला क्रीडा विश्व समिती च्या वतीने व केज तालुक्यातीलकलावंतांनी नायब तहसीलदार श्री. अशोक भंडारे यांना निवेदन देण्यात आले यावेळी अनिल वैरागे, मुनिर कुरेशी,अड.अनिता मुंडे,बलभीम मस्के, सचिन लांडगे,अमोल सरवदे,चंद्रकांत जाधव व केज तालुक्यातील सर्व कलावंत बांधव यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित

# भोंदूबाबा खरात प्रकरणी माकपची जिल्हाभर निदर्शने संपर्कातील सर्वांवर कठोर कारवाईची मागणी

बीड / प्रतिनिधी

भोंदूबाबा अशोक खरात याच्या कारस्थानात महिला आयोगाच्या अध्यक्षांसह अनेक मंत्री, आमदार, लोकप्रतिनिधी, अधिकारी सामील झालेले किंवा बळी पडलेले उघड होत असताना देशात आणि राज्यात ज्या विचाराचे सरकार आहे त्यामुळे श्रद्धेच्या नावाखाली अशा अंधश्रद्धांना पाठबळ व प्रतिष्ठा मिळाली आहे. बुवाबाजीला शरण गेलेल्या संविधानिक पदावरील व्यक्तीविरोधात कारवाई करण्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने सोमवार दि ६ रोजी जिल्हाधर निदर्शने केली.राज्यात सध्या तंत्र-मंत्र, अंगारे-धुपारे करून अडचणीत सापडलेल्यांचे व महिलांचे शोषण करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यात असलेल्या अशोक खरात या बुवा-बाबाने याद्वारे केलेल्या शोषणाला महिला व सामान्य लोक मोठ्या प्रमाणात बळी पडले आहेत. अशोक खरात याच्या या कारस्थानात महिला आयोगाच्या अध्यक्षांसह अनेक मंत्री, आमदार, लोकप्रतिनिधी, अधिकारी एकतर सामील आहेत किंवा बळी पडलेले आहेत. संविधानिक पदांवर व अधिकारांवर असलेल्या




या लोकप्रतिनिधींनी व अधिकाऱ्यांनी संविधानाला अभिप्रेत असलेला वैज्ञानिक दृष्टीकोन स्वत:मध्ये अंगिकारला पाहिजे. समाजातही तो रुजविला पाहिजे. मात्र असे करण्या ऐवजी ते स्वत:च अंधश्रध्दांचे एकतर समर्थक बनत असल्याने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष बीड शाखेने भोंदू बाबा अशोक खरात व त्याच्या सर्व साथीदारांवर कठोर कारवाई करा. अशोक खरात याची संपूर्ण मालमत्ता जप्त करून ती अंधश्रद्ध निर्मूलनाच्या कामासाठी उपयोगात आणा. अंधश्रद्धा व संतापजनक शोषणाच्या या प्रकरणामध्ये ३९ आमदार सामील असल्याचे समोर येत आहे. या ३९ आमदारांची नावे जाहीर करा. त्यांच्या सहभागाचे स्वरूप जनतेला समजावे अशाप्रकारे ते सार्वत्रिक करा. अशा आमदारांचे तत्काळ राजीनामे घ्या. अशोक खरात याच्या शोषणाला बळी पडलेल्या अनेक महिलांचे वाईट व्हिडिओ मोठ्या प्रमाणात समाज माध्यमांवर फिरत आहेत. त्यामुळे बळी पडलेल्या महिलांच्या सामाजिक प्रतिष्ठेला ठेच पोहोचत आहे. असे व्हिडिओ समाज माध्यमांतून तातडीने हटवा. भोंदू बाबा अशोक खरात याच्यावर कठोर कारवाई करत असतानाच त्याला समर्थन देणाऱ्या सर्व लोकप्रतिनिधींवर व विविध मार्गाने त्याला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहाय्य करणाऱ्या सर्वांवर कठोरातील कठोर कारवाई करा. अशोक खरात याच्याबरोबरच इतरही अनेक गावागावांमध्ये सध्या भोंदू बाबांचे उदंड पीक आले आहे. राज्यकर्त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन व विवेकवादाचा पाठपुरावा करण्याऐवजी जाती आणि धर्म आधारित द्वेषवादी अंधश्रद्ध राजकारणाला बळ दिल्याचा हा परिणाम आहे. राज्य सरकारच्या वतीने राज्यातील या सर्व भोंदू बाबांचा बंदोबस्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवा. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन कक्षाची स्थापना करून ते कार्यान्वित करण्याचा शासन निर्णय त्वरित अमलात आणा.जादूटोणा विरोधी कायद्याचे नियम तयार करून या कायद्याची कठोर अंमलबजावणी करा. सोशल मीडियातून होणाऱ्या बाबा-बुवा, ज्योतिषी, मंत्र-तंत्र यांच्या अंधश्रद्धा पसरवणाऱ्या जाहिरातींवर बंदी आणा. अशा जाहिरातींचे नियमन करणारी स्वतंत्र यंत्रणा तयार करा.या मागणी करिता बीड जिल्हा सचिव कॉ.ॲड.अजय बुरांडे व जिल्हा कमिटी मार्फत जिल्हयातील अंबाजोगाई, धारूर, परळी, माजलगाव, सिरसाळा निदर्शने करण्यात आली.

# अंबाजोगाईत निवासी डॉक्टरची आत्महत्या; 'स्वाराती' वैद्यकीय महाविद्यालयात खळबळ

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालया (स्वाराती) मध्ये शिक्षण घेणाऱ्या एका तरुण निवासी डॉक्टरने रोहिदास कॉलनी येथे रूम करून राहत असलेल्या घरांमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना आज उघडकीस आली आहे.



या घटनेमुळे अंबाजोगाई शहरासह संपूर्ण राज्यातील वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून, सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. मंदार दाभाडे असे मृत डॉक्टरचे नाव असून, ते 'स्वाराती' रुग्णालयात पदव्युत्तर (झत्र) शिक्षण घेत होते. अत्यंत होतकरू, अभ्यासू आणि रुग्णसेवेसाठी समर्पित म्हणून त्यांची ओळख होती. उच्च शिक्षण घेऊन समाजाची सेवा करण्याचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले होते. मात्र, त्यांनी असे टोकाचे पाऊल का उचलले, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही.ही घटना समोर येताच वैद्यकीय महाविद्यालय परिसरात शोककळा पसरली. सहकारी डॉक्टर, विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्गाने तीव्र दुःख व्यक्त केले. ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था सक्षम ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या संस्थेतील डॉक्टरचा अशा प्रकारे अंत होणे अत्यंत चिंताजनक मानले जात आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, पंचनामा करून मृतदेह पुढील तपासासाठी पाठवण्यात आला आहे. आत्महत्येमागील कारणांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.दरम्यान, या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रातील ताणतणाव, कामाचा वाढता दबाव आणि मानसिक आरोग्य या विषयांकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले आहे. निवासी डॉक्टरांवर असलेला कामाचा ताण, दीर्घ ड्युटी तास आणि भावनिक दबाव यांचा सखोल विचार करण्याची गरज असल्याची भावना व्यक्त होत आहे.ही घटना केवळ एका कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी मोठी हानी असून, एका होतकरू आणि सेवाभावी डॉक्टरचा असा अकाली अंत सर्वांनाच चटका लावणारा ठरला आहे.